
बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०




साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक २३ | बुधवार, दि.१५ मे २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# बांधकाम विभागाचा नाकर्तेपणा, रुग्णालयाची वसाहत ठरली शोभेची वास्तू!



**गोंदिया,–** जिल्ह्यातील गोरेगाव ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांना मुख्यालयी राहता यावे यासाठी आरोग्य विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रुग्णालयाच्या मागील भागात अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी वसाहतीची निर्मीती करण्यात आली. मात्र, संबंधित बांधकाम विभागाकडून आराखड्यानुसार बांधकाम केले असले तरी काही असुविधांचा "बट' या वसाहतीला लागल्याने बांधकाम पूर्ण होऊन सात वर्षाचा काळ लोटून देखील अद्यापही सदर वसाहत रुग्णालय प्रशासनाकडे हस्तांतरीत करण्यात बांधकाम विभागाला अपयश आले आहे.

परिणामी उद्घाटन होण्यापुर्वीच वसाहतीच्या इमारतींची दैनावस्था झाल्याचे चित्र आहे.तर वसाहतीमधील काही कामे शिल्लक असून पुन्हा करण्याकरीता जिल्हा नियोजन विभागाकडून निधीची मागणी करण्यात आली आहे.त्या निधीला मंजूरी मिळाल्यानंतरही आचारसंहितेचे कारण पुढे करुन त्या वसाहतीच्या शिल्लक कामांना पुर्ण करण्याकरीता बांधकाम विभागाच्यावतीने टाळाटाळ केली जात असल्याने वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना शासकीय निवासस्थानापासून बांधकाम विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे वंचित राहण्याची वेळ आली आहे.

वाढती लोकसंख्या त्यानुसार वाढत असलेली रुग्णसंख्या लक्षात घेता गोरेगाव येथील प्राथमीक आरोग्य केंद्राला सन २००५ या वर्षीपासून ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा बहाल करण्यात आला. तर सन २०१२ मध्ये ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीची निर्मीती करण्यात आली. मात्र ग्रामीण रुग्णालयाच्या दर्जानंतर कर्मचाऱ्यांची झालेली वाढ बघता कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचा प्रश्न ऐरणीवर होता. तेव्हा शासनाच्या वतीने सन २०११-१२ या वर्षी वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी दोन स्वतंत्र व कर्मचाऱ्यांसाठी टाईप १, २, ३ याप्रमाणे तीन वेगवेगळ्या इमारतीच्या निर्मीतीला प्रशासकीय व अर्थिक मंजूरी देण्यात आली.

दरम्यान, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वसाहत निर्मीतीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. ज्याचे बांधकाम सन २०१६-१७ या वर्षी पूर्णत्वास आले. तर बांधकाम पूर्ण करण्यासाठी संबधित विभागाला तब्बल चार वर्षाचा काळही लागला. मात्र चार ते पाच वर्षांपर्यत बांधकाम करूनही वसाहतीत आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्यात आल्या नाही.

विशेष म्हणजे वसाहतीत राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पाण्याची सोय करण्यात आली नाही. तर बांधकाम पुर्ण झाल्यानंतर रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली असता काही कॉर्टरमध्ये खिडक्यांच्या काचा फुटलेल्या अवस्थेत दिसून आल्या, यावर रुग्णालय प्रशासनातर्फे वसाहत हस्तांतरीत न करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हा २० जुलै २०१७ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चमूने पाहणी केली असता बांधकामाच्या आराखड्यानुसार काम झाले अथवा नाही याची विचारणा करून ईस्टिमेटची मागणी रुग्णालय प्रशासनाकडून करण्यात आली होती.तसेच संबंधित विभागाकडे सुविधांच्या पुर्ततेला घेवून अनेकदा पत्र व्यवहार करूनही याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर इतरत्र राहण्याची वेळ आली आहे.

त्यातच वसाहतीच्या निर्मीतीत चार ते पाच वर्षे लोटल्यानंतर बांधकाम पूर्ण होऊन सुमारे ३ वर्षाचा कालावधी होत आहे. अशात मात्र सदर वसाहत हस्तांतरीत झाली नसल्याने वसाहतीकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी ही वसाहत असामाजिक तत्वांसाठी खुले "रान' ठरू पाहत आहे. तेव्हा वरिष्ठांनी याकडे लक्ष देवून प्रश्न त्वरीत मार्गी लावावा अशी मागणी होत आहे.

# समृध्दी महामार्ग विस्तारीकरण; नागपूर-गोंदियासाठी २० निविदा

**मुंबई:** – नागपूर समृध्दी महामार्ग विस्तारीकरण प्रकल्पातील तीन महामार्गांच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मागविलेल्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. तीन प्रकल्पांसाठी एकूण ४६ तांत्रिक निविदा सादर झाल्या आहेत. नागपूर-चंद्रपूरसाठी २२, भंडारा -गडचिरोलीसाठी चार, तर नागपूर-गोंदियासाठी २० अशा एकूण ४६ निविदा सादर झाल्या आहेत. येत्या दहा-बारा दिवसांत आर्थिक निविदा खुल्या करण्यात येणार असून त्यानंतर निविदा अंतिम करून चालू वर्षातच तिन्ही महामार्गांच्या कामाला सुरुवात करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे.

समृध्दी महामार्गाचा नागपूर-चंद्रपूर, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-गोंदिया असा विस्तार करण्यात येणार आहे. या तिन्ही महामार्गांच्या कामासाठी एमएसआरडीसीने ११ टप्प्यांत निविदा मागविल्या होत्या. शुक्रवारी तांत्रिक निविदा खुल्या करण्यात आल्या असून या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. तीन महामार्गांच्या कामासाठी ११ टप्प्यात ४६ निविदा सादर झाल्या आहेत. १९४ किमीच्या नागपूर-चंद्रपूर महामार्गासाठी सहा टप्प्यात २२ निविदा सादर झाल्या आहेत. तर १४२ किमीच्या भंडारा-गडचिरोली महामार्गासाठी एका टप्प्यात चार, तर १६२ किमीच्या नागपूर – गोंदिया महामार्गासाठी चार टप्प्यात २० निविदा सादर झाल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. तर आता दहा-बारा दिवसांत आर्थिक निविदा खुल्या करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. ही निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यादेश जारी करण्यात येणार आहे. हे तिन्ही महामार्ग वाहतूक सेवेत दाखल झाल्यास विदर्भातील वाहतूक व्यवस्था मजबूत होईल, असा दावा करण्यात आला आहे.



**या कंपन्यांच्या आहेत निविदा**

**नागपूर-चंद्रपूर महामार्ग**
- **टप्पा 1** - अॅफकॉन इन्फ्रा, जीआर इन्फ्रा, एनसीसी, मॉंटेकार्लो
- **टप्पा 2** - अॅफकॉन इन्फ्रा, गवार कन्स्ट्रक्शन, बीएससीपीएल इन्फ्रास्ट्रक्चर, मॉंटेकार्लो
- **टप्पा 3** - बीएससीपीएल इन्फ्रास्ट्रक्चर, गवार कन्स्ट्रक्शन, एचजी इन्फ्रा, पीएनसी इन्फ्रा
- **टप्पा 4** - गवार कन्स्ट्रक्शन, एचजी इन्फ्रा, पीएनसी इन्फ्रा
- **टप्पा 5** - गवार कन्स्ट्रक्शन, पटेल इन्फ्रा, एचजी इन्फ्रा
- **टप्पा 6** - बीएससीपीएल इन्फ्रास्ट्रक्चर, गवार कन्स्ट्रक्शन, पटेल इन्फ्रा, एचजी इन्फ्रा.

**नागपूर – गोंदिया महामार्ग**
- **टप्पा 1** - अॅफकॉन इन्फ्रा, जी. आर. इन्फ्रा, मॉंटेकार्लो, एनसीसी
- **टप्पा 2** - अॅफकॉन इन्फ्रा, अॅपको इन्फ्रा, जीआर इन्फ्रा, एनसीसी, पीएनसी इन्फ्रा
- **टप्पा 3** - अॅफकॉन इन्फ्रा, अॅपको इन्फ्रा, एनसीसी, ओरियन्टल स्ट्रक्चरल इंजिनीयरिंग, पीएनसी इन्फ्रा
- **टप्पा 4** - अॅफकॉन इन्फ्रा, मॉंटेकार्लो, ओरियन्टल स्ट्रक्चरल इंजिनीयरिंग, एनसीसी, पटेल इन्फ्रा, पीएनसी इन्फ्रा, मॉंटेकार्लो.

**भंडारा-गडचिरोली महामार्ग**
- टप्पा 1 - गवार कन्स्ट्रक्शन, जीआर इन्फ्रा, जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट, पटेल इन्फ्रा.

# ४१ वर्षापासून प्रवाशांना बसस्थानकाची प्रतीक्षा

## तीव्र उन्हाचे नागरिकांना चटके, राज्य परिवहन विभागाचे कमालीचे दुर्लक्ष, नागरिकांसह व्यापारी-विद्यार्थी त्रस्त



**गोंदिया:** जिल्ह्यातील सालेकसा तालुका स्थापन होऊन ४१ वर्षे झाली. मात्र आजपर्यंत येथे राज्य परिवहनाच्या बसेस धावण्यासाठी बसस्थानक उभारण्यात आले नाही. येथील नागरिक आणि आजूबाजूचे प्रवासी आजही आधुनिक सुविधा असलेल्या बसस्थानकाच्या प्रतीक्षेत आहेत. आज ना उद्या त्यांच्या समस्या ऐकायला कोणीतरी येईल, असा प्रवाशांचा समज आहे. आजही सालेकसा येथे बाहेरगावातून येणाऱ्या बसेस रस्त्यावर उभ्या राहतात. तेथून प्रवासी बसमध्ये चढतात. अशा परिस्थितीत ऊन, पाऊस, थंडी प्रत्येक ऋतूत त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. वर्षानुवर्षे मागणी करुनही राज्य मार्ग परिवहन महामंडळाने बसस्थानक बांधण्यासाठी पुढाकार घेतला नाही. दररोज अनेक नागरिक, व्यापारी व विद्यार्थी आपल्या कामानिमित्त येथे येतात व येथून आमगाव-गोंदियाच्या दिशेने ये-जा करतात. तरीही येथे कायमस्वरूपी बसस्थानक नाही. येथे फक्त एक लहान प्रवासी प्रतीक्षालय आहे. मात्र येथेही सुविधा नाहीत. त्यामुळे प्रवाशांना रस्त्याच्याकडेला बसून उतरावे लागते. याठिकाणी सततच्या गर्दीमुळे अनेकदा वाहतूक व्यवस्था विस्कळीत होऊन अनेक वेळा अपघातही होतात. अशा परिस्थितीत येथे सुसज्ज बसस्थानक बांधण्याची अनेक वर्षापासूनची मागणी आहे.

### पिण्याचे स्वच्छ पाणीही नाही

**बसस्थानक नसल्यामुळे या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची शौचालयाची सोय नाही. भंडारा परिवहन विभागाच्या पथकाने बसस्थानकासाठी जागेचे सर्वेक्षण केले होते. मात्र नंतर ही प्रक्रिया पुढे जाऊ शकली नाही. आणि परिस्थिती जैसे थेच असल्याचे सांगण्यात आले.**

# वित्त विभागाने सहा महिन्यापासून थांबवली एनपीएसधारकांची थकबाकीची रक्कम




**गोंदिया:**जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील सावळा गोंधळ सावरण्याकरीता त्यांना प्रशिक्षणासह विविधप्रकारे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगनाथम करीत आहेत.मात्र सीईओंच्या सुधारणा मोहीमेला हातभार लावण्यापेक्षा त्याला बट लावण्याचेच काम वित्त विभागात सुरु असल्याचे चित्र समोर आले आहे.विशेष म्हणजे गेल्या सहा महिन्यापासून या विभागात राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू असलेल्या वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाच्या स्तर २ (टीअर-सेकंड) मध्ये जमा असलेल्या थकबाकीची रक्कम एनपीएस धारक कर्मचारीच्या खात्यात वर्ग करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे प्रकरण समोर आले आहे.

त्यातच जे कर्मचारी याकरीता वित्त विभागात जाऊन पाठपुरावा करतात,त्यांना बस्स या शुक्रवारला तुमच्या खात्यात रक्कम येईल असे उत्तर देऊन परत पाठवले जाते,असे अनेक शुक्रवार लोटून गेले तरीही वित्त विभागातील लेखाधिकारी हक्काची असलेली सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम देण्यास का टाळाटाळ करतात असे प्रश्न निर्माण झाले असून संबधित लेखाधिकारीवर मुख्य कार्यकारी अधिकारी कारवाई करणार काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सविस्तर असे की सहाव्या वेतन आयोगाच्या रक्कमेचे व्याजासह प्रदान करण्याबाबत शासन निर्णय २० ऑक्टोबर २०२३ ला निर्गमित करण्यात आले.त्यानुसार वित्त विभाग जि.प.गोंदिया यांचे पत्रानुसार पंचायत समिती स्तरावरुन सहाव्या वेतन आयोगाच्या स्तर २ (टायर-सेकंड) मध्ये जमा असलेल्या कर्मचाऱ्यांची थकबाकी रक्कमेची माहिती वित्त विभागात सादर करण्यात आली.ही माहिती सादर करुन सहा महिन्याचा कालावधी लोटून देखील सहाव्या वेतन आयोगाच्या स्तर (टायर सेकंड) मध्ये जमा असलेल्या थकबाकी व्याजासह संबंधित एनपीएस धारक कर्मचारीच्या खात्यात वर्ग करण्यात आलेले नाही.त्यामुळे अनेकांनी वित्त विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्याशी संपर्क साधले असता शुक्रवारपर्यंत संपूर्ण कार्यवाही होईल असे सांगितले गेले.

परंतु या सहा महिन्यात कित्येक शुक्रवार गेले तरी कार्यवाही मात्र जैसे थे तशीच आहे?.त्यातच या रक्कमेवर मिळणाऱ्या व्याजापासूनही कर्मचारीवर्गाला वित्त विभागाच्या एका अधिकाऱ्यामुळे वंचित रहावे लागले आहे.विशेष म्हणजे या थकबाकीपोटी देण्यात येणारी रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत जमा झाल्याच्या दिनांकापासून कार्यालयीन कामाकाजाच्या दहा दिवसाच्या आत कर्मचाऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्याच्या सुचना देखील शासन निर्णयात नमूद असतांना वित्त विभागातील लेखाधिकारी शासन निर्णयाला फाटा देण्यामागचे काय अर्थकारण आहे अशी विचारणा होऊ लागली आहे.तर या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लगेच लक्ष घालून संबधितावर कारवाई करावी अशी मागणीही एनपीएसधारक कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे.

# मतमोजणीच्या कामात दक्ष राहून मतमोजणी करावी



**भंडारा:** – ११ भंडारा गोंदिया लोकसभा मतदार संघाच्या मतदानाची मतमोजणी येत्या ४ जून रोजी पलाडी येथे होणार असून त्या दृष्टीने मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी दक्ष राहून मतमोजणी करावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी भंडारा योगेश कुंभेजकर यांनी आज सोमवारी बैठकीत दिले.

या बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी आशा पठाण, निवासी उपजिल्हाधिकारी भंडारा स्मिता बेलपत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी गोंदिया विजया बनकर, नोडल अधिकारी प्रशिक्षण लिना फलके, अतिरिक्त पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर रणदिवे यासह सर्व नोडल, अधिकारी कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी मतमोजणीसाठी करावयाची टेबलनिहाय रचना, माध्यम कक्ष, सुरक्षा व्यवस्था, सुरक्षा व्यवस्थेसाठी नियुक्त अधिकारी कर्मचारी, आपत्ती संबंधी नियंत्रण कक्ष,सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावयाची पूर्वतयारी, भोजन व्यवस्था, मतमोजणी प्रक्रियेतील गोपनियता याबाबत श्रीमती लिना फलके यांनी पिपीटीसह सादरीकरण केले. या मतमोजणी प्रक्रियेतील अधिकारी कर्मचाऱ्यासाठी प्रथमोपचाराचे साहित्य व वैद्यकिय उपचार सुविधेबाबतही निर्देश देण्यात आले.

# शेतकऱ्यांना झटका, खतांच्या किमतीत वाढ

**सध्याच्या खताच्या किमती**

| | |
|---|---|
| सुफला | १४७० रुपये प्रति बॅग |
| १०-२६-२६ | १४७० रुपये प्रति बॅग |
| डीएपी | प्रति बॅग १३५० रुपये |
| एमओपी | १७०० रुपये प्रति बॅग |
| युरिया | २६६ रुपये प्रति बॅग |
| सुपर फॉस्फेट | ६०० रुपये प्रति बॅग |

**गोंदिया:** गेल्या दहा वर्षापासून रासायनिक खतांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. तर कृषी उत्पादनांच्या किमतीत फारशी वाढ झालेली नाही. यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर पाण आला आहे. युरिया वगळता सर्व रासायनिक खतांच्या किमती १५०० रुपयांच्या पुढे गेल्याने शेतकऱ्यांना खतांवर वर्षाला एकरी ४० हजार रुपयांपर्यंत खर्च करावा लागत आहे. पीक उत्पादनावर परिणाम करणाऱ्या हवामानातील अनियमिततेनेही त्यात भर पाडली आहे. रासायनिक खतांच्या किमती खत कंपन्या मनमानी पद्धतीने वाढवत असल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पानातून मिळणाऱ्या उत्पन्नात लागवडीचा खर्चाचा ताळमेळ बसणे कठीण झाले आहे.

### खत कंपन्यांचा मनमानी कारभार

**शेतकऱ्यांना मुख्य खतासोबतच लिकिंगची खते खरेदी करण्याची सक्ती केली जाते. याबाबत अनेकदा बैठक व चर्चा होऊनही हा प्रश्न अनुत्तरीत आहे. गेल्या नऊ वर्षापासून खाजगी खत कंपन्या बिनदिक्कतपणे लिकींगचे खत माथी मारत आहेत. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची वेळ आली आहे. वाढत्या उत्पादन खर्चाचे नियोजन, सबसिडी कमी तसेच लिकींगमुळे अनावश्यक खते आणि कीटकनाशकांची सक्तीने खरेदी केल्याने शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक बोजा पडत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.**

### शासनाच्या हस्तपेक्षाची मागणी

सरकारने रासायनिक खतांच्या किंमती नियंत्रणात आणण्यासाठी आणि खत कंपन्यांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी तातडीने पावले उचलावीत. अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.



# गोंदियात मुलींच्या जन्मदारात वाढ....

## एका वर्षात २,३२६ बालिकांचे आगमन



**गोंदिया:** वंशाला दिवा हवा, म्हणून काल-परवापर्यंत कुटूंबात मुलगाच हवा, असा हट्टाहास काही कुटूंबाकडून करण्यात येत होता. गर्भलिंग निदान करुन गर्भातील कळ्या खुडल्या जात होत्या. त्यामुळे मुलींची संख्या कमी होऊन त्या तुलनेत मुलांची संख्या वाढून समतोल ढासळला. त्यातच आता मुली प्रत्येक क्षेत्रात समोर जात आहेत. हे उमगल्यामुळे आता कुटूंबियांनीदेखील स्त्री जन्माचे स्वागत करणे सुरु केले आहे. गत काही वर्षापासून जिल्ह्यातील मुलींची संख्या वाढत असल्याचे शासकीय आकडेवारीवरुन दिसून येत आहे. २०२३ मध्ये जिल्ह्यात तब्बल २,३२६ सावित्रीच्या लेकींनी जन्म घेतला असून मुलांच्या तुलनेत ती संख्या केवळ १९७ एवढी कमी आहे. त्यामुळे जिल्ह्यात नकोशी असलेली मुलगी आता हवीशी होत असल्याचे आकडेवारीवरुन दिसून येत आहे.

म्हतारपणी मुलगाच आपला सांभाळ करणार, अशी आईवडीलांची अपेक्षा असते. मात्र मुलांकडूनच आपल्या आईवडीलांना घराच्या बाहेर ढळले जात असल्याचीही कित्येक उदाहरणे दैनंदिन जीवनात बघावयास मिळत आहेत. याऊलट मुलीच मुलांची जागा घेऊन आपल्या आईवडीलांचा सांभाळ करताना दिसत आहेत. एवढेच काय तर त्यांना अखेरचा निरोपही मुलीच देत असल्याचेही दिसून येते. म्हणूनच काळानुसार लोकांच्या डोक्यात घर करुन बसलेली जुनी धारणा आता संपुष्टात आली असून मुलगा असो वा मुलगी दोघे एकसमान हे सर्वांना उमगले आहे. यामुळेच आता मुलगा-मुलगीमधील फरक कमी होत चालला आहे. नगरपरिषद कार्यालयातील नोंदणीनुसार २०२३ मध्ये २,५२३ मुलांनी तर २,३२६ मुलींनी जन्म घेतला. म्हणजेच मुलांच्या तुलनेत मुलींच्या संख्या केवळ १९७ एवढी कमी आहे. येत्या काळात हा फरक पूर्णपणे संपून ताईंची संख्या जास्त राहणार, यात शंका नाही. मुला-मुलींमधला फरक आता कमी झाला असला तरी, ग्रामीण भागात मात्र आजही कित्येक कुटूंबात वंशाला दिवा म्हणून मुलगाच हवा आहे. मुलाच्या नादात अपत्यांची संख्या वाढत जाते. परिणामी, जास्त मुले होऊन त्यांचा सांभाळ करणे कठीण जाते. अशात मुला-मुलींमधील फरक लोकांच्या डोक्यातून काढण्यासाठी ग्रामीण भागांत आजही जनजागृतीची गरज आहे.

### महिनानिहाय बाळांची जनसंख्या

**२०२३ मध्ये जन्माला आलेल्या मुलींच्या संख्येत जानेवारी महिन्यात २१९ मुले व १९७ मुली, फेब्रुवारी २१३ मुले व १८५ मुली, मार्च १७९ मुले व १६९ मुली, एप्रिल २४४ मुले व २०२ मुली, मे १५७ मुले व १८४ मुली, जून १६५ मुले व १३९ मुली, जुलै १९७ मुले व २०६ मुली, ऑगस्ट १९३ मुले व १८७ मुली, सप्टेंबर २३३ मुले व २२६ मुली, ऑक्टोबर २५२ मुले व २०८ मुली, नोव्हेंबर १९२ मुले व १६८ मुली तर डिसेंबर महिन्यात २७९ मुले तसेच २५५ मुलींनी जन्म घेतला. वर्षभरात मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या १९७ ने कमी आहे.**

### जनजागृतीमुळेही वाढले प्रमाण

**अलिकडे मुली उच्च पदावर जात आहेत. त्यातच मुलांपेक्षा मुली आपल्या कुटूंबाचा चांगल्याप्रकारे सांभाळ करीत आहेत. त्यामुळे पालकही आता मुलाचा हट्ट न करता मुलींच्या संगोपनाकडे लक्ष देत आहेत. शासनाच्यावतीनेदेखील मुलगी वाचवा, मुलगी शिकवा, असे अनेक कार्यक्रम राबवून जनजागृती सुरु आहे. मुलींच्या जन्मावर सवलती, अनुदान देण्यात येत आहे. त्याचाही मुलींचा जन्म दर वाढण्यावर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे.**

# पोलीस-नक्षल चकमकीत कमांडर वासूसह तीन नक्षलवादी ठार



**गडचिरोली :** घातपात घडवून आणण्याच्या तयारीत असलेल्या नक्षलवाद्यांचा कट उधळून लावत सी- ६० जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. यात पेरमिली दलमचा प्रभारी व नक्षलवाद्यांच्या विभागीय समितीचा कमांडर वासू याच्यासह दोन महिला नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले. १३ मे रोजी सकाळी भामरागड तालुक्यातील कतरंगट्टा येथील जंगलात ही चकमक उडाली.

नक्षल्यांचा सध्या "टीसीओसी' कालावधी सुरु आहे. यात पेरमिली दलमचे काही सदस्य भामरागड तालुक्यातील कतरंगट्टा गावाजवळील जंगल परिसरात तळ ठोकून बसल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांना मिळाली होती. त्यानुसार, त्यांनी विशेष अभियानचे अपर पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सी- ६० जवानांच्या दोन तुकड्या तातडीने परिसरात शोधासाठी रवाना केल्या. पथके परिसरात शोध मोहीम राबवत असताना नक्षलवाद्यांनी त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला, सी-६० जवानांनीही त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले.

गोळीबार थांबल्यानंतर आणि परिसराची झडती घेतल्यानंतर एक पुरुष आणि २ महिला नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळले. पेरमिली दलमचे प्रभारी आणि विभागीय समितीचा कमांडर वासू समर कोरचा रा.गोंडीया पूर्व बस्तर छत्तीसगड, रेशमा मरकाम बस्तर, कमला मडावी दक्षिण बस्तर यांचा समावेश आहे. यांच्यावर अनुक्रमे १६, ४ व २ लाख असे शासनाने बक्षीस जाहीर केले होते.

घटनास्थळी तीन स्वयंचलित शस्त्रे , एक एके ४७, १ कार्बाइन आणि १ इन्सास असे साहित्य व नक्षल साहित्य आढळून आले आहे. हे साहित्य जप्त केले असून परिसरात नक्षलविरोधी अभियान अधिक गतिमान करण्यात आले असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

साप्ताहिक
बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.१५ मे २०२४


## संपादकीय

# जागतिक कुटुंब दिन

१९८३ मध्ये, आर्थिक आणि सामाजिक परिषद आणि सामाजिक विकास आयोगाने संयुक्त राष्ट्रांनी कौटुंबिक समस्यांवर लक्ष केंद्रित करण्याची शिफारस केली. णछ ने ओळखले की बदलत्या आर्थिक आणि सामाजिक संरचनेचा जगभरातील कौटुंबिक घटकांवर परिणाम होत आहे. म्हणून, १९९३ मध्ये, अधिकृतपणे १५ मे हा आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन म्हणून घोषित करण्यात आला.

१५ मे १९९४ रोजी युनायटेड नेशन्समध्ये सर्वप्रथम जागतिक कुटुंब दिन साजरा करण्यात आला होता. आजच्या व्हॉट्सअप, फेसबुकच्या जमान्यात विभक्त कुटुंब पद्धतीच ट्रेंड दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे अनेकदा मुलांची त्यातून फरफट होते. मुळातच पाळणा घरापासून आयुष्याची सुरुवात करणाऱ्या मुलांना घरच्या संस्काराची उणीव भासतेच. "छोटे कुटुंब, सुखी कुटुंब' या संकल्पनेचे अनुकरण केल्याने नवीन पिढीला कौटुंबिक स्वास्थ्य मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे आजीच्या हातचे जेवण, आजी-आजोबांच्या गोष्टी या सुखाला मुले मुकतात. अशा परिस्थितीत त्यांना कुटुंबाची जाणीव होण्यासाठी दरवर्षी १५ मे रोजी "जागतिक कुटुंब दिन' साजरा केला जातो. भारतीय लोकांनी कुटुंब व्यवस्था जतन केली आहे म्हणून ते समाधानी जीवन जगू शकतात. मूळ अमेरिकन आणि ब्रिटीश लोक मात्र आर्थिकदृष्ट्या संपन्न असूनही तेवढे समाधानी नाहीत. याचे कारण या समाजाने आपली कुटुंब व्यवस्था टिकवलेली नाही हे आहे. या लोकांमध्ये घटस्फोट, आई-वडिलांविना कुटुंबे यांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे आज या देशांत कुटुंब व्यवस्था जतन करण्याचे आवाहन केले जात आहे. जागतिक कुटुंब दिवस पाळण्याची कल्पना त्यातूनच निर्माण झालेली आहे. "छोटं कुटुंब, सुखी कुटुंब' या घोषणेच्या आजच्या जगात एकत्र कुटुंबांची संख्या कमी झाली आहे. परंतु असं असलं, तरी अलीकडच्या या विभक्त कुटुंब पद्धतीला तडा देत आजी-आजोबा, आई-बाबा, काका-काकू, चुलत भावंडे अशा भल्या मोठया गोतावळ्यासह राहणारी काही मोठी सुखी कुटुंबंही आहेतच.

भारतीय कुटुंब पद्धतीबाबत विचार केला असता प्राथमिक व संयुक्त कुटुंब पद्धत एकविवाही व बहुविवाही कुटुंबद्धत, मातृसत्ताक व पितृसत्ताक कुटुंबपद्धत आढळून येते. कुटुंब म्हणजे परस्परांशी नाती असलेला माणसांचा समूह खरतर माणसामधील नाती ही आपल्या जन्मावरून विवाहवरून अथवा एखाद्याला दत्तक घेण्यावरून निर्माण होतात. कुटुंब संस्था एकत्र अथवा विभक्त अशी दोन्ही प्रकारची असू शकते. विभक्त कुटुंबसंस्थेत आई-वडील, पती-पत्नी, मुलगा-मुलगी असे प्राथमिक घटक असतात. खर तर एकत्र कुटुंबपद्धती इतर दुय्यम नातेसंबंधाचा अंतर्भाव होतो. एकत्र कुटुंबसंस्थेत आजी-आजोबा, आई-वडील, पती-पत्नी, मुलगा-मुलगी, काका-काकू त्यांची मुले-मुली असे घटक असतात. साधारणः वडील हा कुटुंबाचा प्रमुख असतो. भारतीय संस्कृतीत एकत्र कुटुंब व्यवस्थेला एक वेगळेच महत्त्व आहे. प्राचीन काळापासून अगदी रामायण महाभारताच्या काळात आपण पाहिले तर, एकत्र कुटुंब व्यवस्थेला एक वेगळेच महत्त्व आहे. आज बायका संसाराला हातभार म्हणून नोकऱ्या करायला लागल्या आहेत. त्यामुळे नवरा बायको दोघे नोकरीसाठी बाहेर असतात. त्यांची मुले शाळेत असली तरी, त्यांना डब्यात पोळी-भाजी ऐवजी कुरकुरे, केक, ड्रायफुड असे काहीतरी दिले जाते. खर तर कुटुंब म्हटलं म्हणजे एक माळच आहे. ही माळ प्रेमाच्या धाग्याने गुंफल्या जाते. कुटुंबात राहणारा प्रत्येक व्यक्ती हा महत्वाचा घटक असतो. संकटाच्या क्षणी संपूर्ण कुटुंब एकत्र कुटुंबपद्धतीत एकजुटीने संकटाचा सामना करतात. कुटुंब टिकवायचे असेल, तर कुटुंबातील सदस्यांमध्ये आपसात प्रेमभाव असणे गरजेचे आहे. आपल्या कुटुंबाचे ऐक्य नेमहीसाठी टिकून राहील, हा सुखी कुटुंबाचा खरा महामंत्र आहे. आज देशात वाढत असलेल्या विभक्त कुटुंब पद्धतीबाबत आपण विचार करायला हवा. खर तर वृद्धाश्रम आपली भारतीय संस्कृती नाही.

सर्वांना जागतिक कुटुंब दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

कुटुंबापेक्षा मोठं
धन कोणतंच नाही...
वडिलांपेक्षा चांगला
सल्लागार कोणीही नाही...
आईच्या सावलीपेक्षा मोठं
जग कोणतंच नाही...
भावापेक्षा उत्तम
भागिदार कोणीही नाही...
बहिणीपेक्षा जवळची
शुभचिंतक कोणीही नाही...
कुटुंबापेक्षा उत्कृष्ट आपलं
दुसरं जग व जीवन
असूच शकत नाही.....

# छत्रपती संभाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन

छत्रपती संभाजी महाराज म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे पुत्र, औरंगजेबा विरुद्ध लढणारे आणि स्वराज्याकरिता बलिदान देणारे, ही जशी त्यांची ओळख आपल्याला आहे. त्यापेक्षा अधिक शंभूराजेंचे कार्यकर्तृत्व आहे. चारशे वर्षा पासून इथल्या मनुवादी मानसिकतेने ग्रासलेल्या साहित्यिकांनी, इतिहासकारांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे अनेक पैलू दडवून ठेवले आहेत. उलट त्यांची बदनामी करणारे साहित्य इथल्या अनैतिकवादी इतिहासकारांनी लिहून ठेवलेले आहे. जसं कोंबड्याला जरी झाकून ठेवले तरी दिवस उजाडायच थांबत नाही, तसंच कोणाचं कार्यकर्तृत्व कितीही दडविण्याचा प्रयत्न केला तरी ते लोकसागरातून समोर येत असते. संभाजी महाराज जसे लढवय्ये होते तसेच ते महान लेखक, पितृ - मातृभक्त, पराक्रमी, चारित्र्यसंपन्न, न्यायी आणि स्वाभिमानी राजे होते. हा वारसा त्यांना भोसले कुळातून मालोजीराजे, शहाजीराजे, शिवाजी महाराज, जिजाऊ यांच्याकडून प्राप्त झाला होता. तसेच स्त्रीकडे मातेसमान बघण्याचा दृष्किोन हा आजी जिजाऊ आणि वडील शिवाजी महाराजांकडूनच नव्हे तर मातृ वंशक भोसले कुळाकडून्ही प्राप्त झाला होता.

मल्हारराव चिटणिसाने बखरींना जन्म, फक्त संभाजी महाराजांची बदनामी कारण्याकरिताच दिला असावं असं बखरीचा अभ्यास केल्यानंतर वाटतो. खोट्या कथा, काल्पनिक पात्रांची निर्मिती करुन संभाजी महाराजांना स्त्रीविरोधी, बदफैली, व्यसनी, दुराचारी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. चिटणीसांच्या बखरीमुळे संभाजी महाराजांचे कार्यकर्तृत्व, शौर्य, राज्यप्रशासन, साहित्य, काव्य, त्यांचा प्रेमळपणा, स्त्रीविषयक सन्मानजनक दृष्किोन समोर आणण्याकरिता प्रयत्न मराठा सेवा संघ सारख्या संघटनांना समोर यावं लागलं.

**शिवराय - जिजाऊंचे संस्कार :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्त्रियांचा अपमान, बेअब्रू करणार्यांना जबर शिक्षा दिलेल्या आहेत. रांझाच्या पाटलाने स्त्रीची बेअब्रू केली म्हणून त्याचे डोळे काढून हात कलम केलेत. लढाईमध्ये सापडलेल्या एका मुस्लिम सरदाराच्या सुनेचा साडी चोळी देवून आईचा दर्जा देवून, सन्मानाने तिची पाठवणी केली. सावित्रीबाई गायकवाड या स्त्री सरदाराचा जिंकलेला प्रदेश त्यांना परत करुन बहिणीचा दर्जा शिवाजी महाराजांनी दिला. ही चारित्र्यसंपन्नता, नैतिकता महाराजांना मिळाली होती आऊसाहेब जिजाऊ कडून, जिजाऊंच्या संस्कारातून. अशा चारित्र्यसंपन्न राजाचा मुलगा म्हणजे संभाजी महाराज. संभूराजे बालपणापासून शिवाजी महाराजांची नैतिकता, कार्यकर्तृत्व व चारित्र्यसंपन्नता बघत होते. ते संस्कार संभूराजेंवर होत होते. तसेच ज्या जिजाऊने शिवाजी महाराजांवर संस्कार केले होते, त्या जिजाऊंच्या संस्काराच्या सानिध्यात वयाच्या बालपणापासून पासून वयाच्या १७ वर्षा पर्यंत घडत होते. म्हणजे ज्या जिजाऊने शिवाजी महाराजांवर संस्कार केलेत त्यांनीच संभाजी राजेंवर संस्कार केलेत. भोसले कुळ म्हणजे मातृवंशीय कुळ. या मातृवंशीय कुळाचा इतिहास जिजाऊंनी ज्या संभाजी राजेंना दिला ते संभाजी राजे व्यसनी, स्त्रीलंपट कसे होवू शकणार? हा साधा विचार मल्हार चिटणिसाला व त्याच्या नंतरच्या मनुवादी विचारसरणीच्या पिलावळीने करू नये. यातूनच बहुजन महानायकाच्या विषयी किती द्वेष व तिरस्कार इथल्या तथाकथित पुरोहितांच्या मानत आहे हे दिसून येतो.

**पत्नी येसूराणीचा सन्मान :**

स्वराज्याच्या पहिल्या कुलमुखत्यार जिजाऊंच्या मृत्यू नंतर शिवाजी महाराजांनी कुलमुखत्यार पद त्यांच्या थोरल्या सून आणि शंभूराजेंची पत्नी येसूराणी यांना दिले. (कुलमुखत्यार पद म्हणजे आजचे राष्ट्रपती पद) म्हणजे भोसले कुळात स्त्रियांना राज्यकारभाराचे अधिकार होते. स्त्रियांचा सन्मान केल्या जात होता. अशा मातृवंशीय कुळात शंभूराजेचा जन्म झाला होता. भोसले कुळाचा हा वारसा संभाजी राजेंनी पुढे नेल्याचे दिसून येते. संभाजीराजे छत्रपती झाल्यावर 'कुलमुखत्यार पद' येसूराणी कडेच ठेवून त्यांच्या अधिकाराची व्याप्ती वाढवली. काळाच्या पुढे पाऊल टाकत, ज्या काळात स्त्रियांना हिन, गुलामीची वागणूक दिली जात होती, ज्या काळात अनेक लग्न केल्या जात होते त्या काळात शंभूराजेनी एकच लग्न करुन 'पत्नीव्रत' घेतल्याचे दिसून येते. संभाजी महाराजांनी पत्नी येसूराणीला 'श्री सखी राज्ञी जयती'हे पद बहाल करून त्या नावाची राजमुद्रा त्यांना बहाल करतात. श्री म्हणजे महान, सखी म्हणजे सोबती, राज्ञी म्हणजे राणी, जयती म्हणजे जय हो. म्हणजे "महान अशा माझ्या सोबती असणाऱ्या येसूराणी साहेबांचा विजय असो". या अर्थाची राजमुद्रा संभाजीराजेंनी पत्नी येसूराणींना दिली. म्हणजे पतीने पत्नीच्या अधिकारा करिता, अस्तित्वा करिता कसं वागावं? व पत्नीला कसं वागवायचं? याचा आदर्शच निर्माण करून दिला. स्त्रियांनी रामाचा आदर्श समोर ठेवायचं की नाही तो त्यांचा प्रश्न आहे. परंतु पत्नीशी एकनिष्ठ आणि पत्नीला अधिकार देवून तिच्यावर प्रेम करणाऱ्या संभाजी महाराजांचे चरीत्र स्त्रियांनी आपल्या नवऱ्याला अवश्य वाचायला द्यावे.




**मातृभक्त :-**

छत्रपती संभाजी महाराज जसे प्रजाहित दक्ष राजे होते, तसेच ते मातृभक्त होते. संभाजी राजेंची जन्मदात्री आई सईराणी होत. शंभूराजे दोन वर्षाचे असतांना सईराणीचा मृत्यू झाला. त्यांना आजी जिजाऊ प्रमाणे सात सावत्र मातेंचे प्रेम मिळालं होत. नव्हे त्यांना सावत्रपणा जाणवलाच नाही. शंभूराजेनी सुद्धा आपल्या सर्व मातेंना कधीही अंतर दिल नाही. सर्वांची आयुष्यभर काळजी घेतली. त्यांची ख्याली - खुशाली ठेवली. संभाजी महाराजांना मातृभक्तीची प्रेरणा मिळाली ती वडीलांकडून आणि शाक्त पंथातून. संभाजी महाराज मातृसत्ताक असलेल्या 'शाक्त धर्माचे' पुरस्कर्ते होते. ज्या धर्माने स्त्रियांना शूद्र समजून जनावरापेक्षाही हिन वागणूक दिली होती त्या धर्माला ठोकर मारून मातृत्वाला प्रेरणा मानणाऱ्या शाक्त धर्माचा स्वीकार केला होता. अष्टप्रधान मंडळातील अण्णाजी पंत, राहुजी सोमनाथ, मोरोपंत, बाळाजी पंत, प्रल्हाद पंत या सर्व पंतानी संभाजी महाराजांच्या सावत्र आई सोयराराणी यांची दिशाभूल करून त्यांना संभाजी राजे विरुद्ध भूमिका घेण्यास भाग पाडले होते. राजेंना हे जेव्हा कळाले की आपल्या मातोश्रीची कारभाऱ्यांनी दिशाभूल केली, तेव्हा राजेंनी सोयराराणीची भेट घेऊन स्वराज्याचा शिव विचार पटवून दिला आणि सोयराराणी मातोश्रींविषयी उदगार काढले, माझ्या सोयरा मातोश्री स्पटीका प्रमाणे निर्मळ मनाच्या आहेत. हा संभाजी महाराजांचा मातृभक्तीचा विचार आजच्या पिढीला आम्ही थोडा जरी दिला तर वृद्धाश्रमाची गरज पडणार नाही.

**गुप्तहेर खाते :-**

शिवाजी महाराजानी स्थापन केलेल्या स्वराज्याचे कान आणि डोळा म्हणजे गुप्तहेर खाते. गुप्तहेरांच्या बातमीच्या आधारावरच शिवाजी महाराज नियोजन करुन धोरण आखत असत. शिवाजी महाराजांप्रमाणे संभाजी राजेंनी सुद्धा आपले स्वतंत्र गुप्तहेर खाते निर्माण केले होते. जीवावर उदार होवून, शत्रूच्या गोटात जावून माहिती आणण्याचे काम हेरांना करावे लागते.

या गुप्तहेर खात्यात तेव्हाही आणि आताही पुरुषांचीच मक्तेदारी आहे. अशा खात्यात संभाजी महाराजांनी स्त्रियांची नियुक्ती करुन त्यांच्या क्षमतेचा आणि बुद्धिमतेचा सन्मान केला होता. पात्रतेनुसार संधी देतांना कधी स्त्री - पुरुष असा भेद केला नाही. स्त्रियांच्या बाबतीत समतावादी दृष्टीकोन ठेवणारा राजा म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होत.

**गोदावरी-तुळसा-कमळा :-**

ब्राम्हणी व्यवस्थेला जेव्हा बहुजन महानायकांचे कर्तृत्व संपविता येत नाही तेव्हा त्यांचे चारित्र्याश्र बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. हा इतिहास आहे. यातून या पुरोहितशाहीने संभाजी महाराजांना सुद्धा सोडलं नाही. संभाजी राजेंच्या चरित्रात चिटणीस, कवी बी, राम गणेश गडकरी, आत्माराम पठारे, वसंत कानेटकर यांनी गोदावरी-तुळसा-कमळा या काल्पनिक पात्रांची निर्मिती करून त्यांना शंभु चरित्रात त्यांची प्रियेसी म्हणून दाखविण्याचे पाप एकाच जातीतील इतिहासकारांनी केले आहे. जे जिजाऊ-शिवरायांच्या संस्कारात घडले. वयाच्या आठव्या वर्षापासून स्वराज्य रक्षणाकरिता कार्यरत राहिले. ३२ वर्षांच्या आयुष्यात शंभुराजेंनी, जगाने दखल घ्यावे अशा साहित्याचे वयाच्या चौदाव्या वर्षा पासून लेखन केले.

एकाच वेळी इंग्रज, फ्रेंच, डच, मोगल, आदिलशाही, निजामशाही, सिद्धी या बलाढ्य शत्रुंना परास्त करणाऱ्या संभाजी राजेंना चैनीचं जीवन जगण्याकरिता वेळ कसा मिळणार? हा साधा प्रश्न त्यांच्या मनात येऊ नये. इतिहासकारांनी इतिहास लिहितांना संभाजी राजे कोण होते? याचे भान न ठेवतता, फक्त सूड भावनेने काल्पनिक कथांना जन्म देवून, ज्यांच्या कार्यकर्तृत्वाला जो काळीमा फासण्याचा प्रयत्न मल्हार चिटणीससा पासून ते आताच्या बाबा पुरंदरे, भावे, बेडेकर, पर्यंत सुरूच आहे. याचे कारण म्हणजे बहुजन द्वेष. हा बहुजन द्वेष आजही ठासून भरल्याचे आरक्षण, ओबीसीं जनगणना, पदोन्नती, राजकीय संधी, धार्मिक अधिकार, सांस्कृतिक आणि प्रचार-प्रसार माध्यमाच्या बाबतीत बहुजनांना विरोध करतांना दिसून येतो.

मित्रांनो, लोकशाही शासन व्यवस्थेतितील सरकारांनी जिजाऊ-शिवाजी-संभाजी महाराजांच्या स्त्रीविषयक दृष्किोनाचा अभ्यास करून त्याचे अनुकरण केले असते तर भारतातील जागतिक दर्जाच्या महिला खेळाडूंना स्त्री शोषण, विनयभंग करणाऱ्या कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष-खासदार असणाऱ्या ब्रिजभूषण यादव वर गुन्हे दाखल करून अटक करा म्हणून आंदोलन करण्याची गरज पडली नसती. ब्रिजभूषला अटक तर लांब उलट त्याच्या मुलास खासदारकीची तिकीट. हजारो वर्षापासून ब्रिजभुषण सारख्यांचे समर्थन करणारेच बहुजन महामानवांची वारंवार बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहेत.

जिजाऊ-शिवराय- संभाजी राजेंच्या देशात स्त्रियांची धिंड काढण्यापर्यंत मजल जात असताना सरकार मात्र मूग गिळून गप्प आहे. बेटी बचाव - बेटी पढावचा नारा देणारे जेव्हा मणिपूर मधील स्त्रियांची आब्रू ओरबडल्या जात होती तेव्हा सत्ताधारी डोळ्यावर आंधळी पट्टी बांधून होते. स्त्रियांना फक्त भोग वस्तू समजणाऱ्या रेवन्नाला जाहीर स्टेवरून निवडून देण्याचे जनतेला आव्हान करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना जनतेने धडा शिकवणे आवश्यक आहे. स्वतः स्वतःच्या स्त्रीच्या गळ्यातील मंगळसूत्र फेकणारे मात्र दुसरे तुमचा मंगळसूत्र विकणार अशी भिती दाखवत आहेत. अशांपसून सावध राहणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजी महाराज असते तर अशा लोकांचे सर कलम केले असते.

संभाजी महाराजांची स्त्री विषयक बदनामी करण्याचा प्रयत्न इथल्या मनुवादी साहित्यिक, लेखक, वक्त्यांनी केलेला असला तरी सुद्धा रयतेच्या मनातले, पराक्रमी, स्वाभिमानी, चारित्र्यसंपन्न, बुद्धिवान, साहित्यिक, मातृभक्त, स्त्रियांचा सन्मान करणारे छत्रपती संभाजी महाराज मात्र पुसता आले नाही. संभाजी महाराजांचे चारित्र्य अत्यंत निर्मळ होते. मातृभक्तीचे प्रतिक असणाऱ्या जिजाऊचे विचार आणि संस्कार त्यांना लाभले होते. म्हणूनच त्यांनी स्त्रीचा अपमान करणाऱ्या धर्म व्यवस्थेला नाकारून स्त्रीसत्ताक पद्धतीचा पुरस्कार करणाऱ्या शाक्त धर्माचा स्वीकार केला होता. आज आपण हे धारिष्ट्य करण्यास कितपत तयार आहोत....? स्त्रीत्ववादी दृष्टीकोन ठेवणारे, मातृभक्त असणाऱ्या संभाजी महाराजांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन. (१४ मे १६५७)

**अनिल भुसारी, तुमसर जि. भंडारा ८९९९८४३९७८**

# हजारो वऱ्हाडांच्या साक्षीने ज्योती अडकली विवाह बंधनात

**गोंदिया:** मायबापाचे छत्र हरपल्याने अनाथ झालेल्या ज्योतीला अनाथांची माय डॉ. सविता बेदरकर यांनी आधार दिला. आपल्या मुलीप्रमाणे तिचा सांभाळ केल्यानंतर लग्नाच्या वयात आलेल्या ज्योतीच्या लग्नाची जबाबदारीही डॉ.बेदरकर यांनी घेतली व १० मे रोजी हजारो वऱ्हाड्यांच्या साक्षीने ज्योती विवाह बंधनात अडकली. समाजशील दानदात्यांच्या योगदानाने हे संभव झाले असून आशिर्वादाच्या गंध अक्षता उथळून ज्योतीचा विवाह सोहळा आनंदात पार पडला.

गोंदिया तालुक्यातील ग्राम गिरोला-पांढराबोडी येथील रहिवासी ज्योती गणलाल राऊत जन्मदात्या मायबापाचे छत्र हरविल्याने अनाथ झाली. मात्र डॉ.सविता बेदरकर यांनी ज्योतीची सर्वस्वी जबाबदारी घेतली होती. मान्सकन्या समजून तिला वेळोवेळी मदतीच हात पुढे करण्यात येत होता. ज्योती वयात आली तिच्या वैवाहिक जीवनाची जबाबदारी आली. गावातीलच सुजण तरुण आशिष वसंता नागफासे याने ज्योतीला लग्नाची



मागणी घातली. अनाथ मुलींचे वैवाकि जीवन सुखी जावे, तिचा वैवाहिक कार्यक्रम सोपस्कर पार पाडावा अशी खुणगाठ अंगी बाळगून डॉ. बेदरकर यांनी ज्योतीचे लग्न ठरविले व १० मे रोजी मुहूर्त काढला. जिल्ह्यातील दानदात्यांच्या उत्स्फूर्त योगदानाने व डॉ. बेदरकर यांच्या पुढाकाराने हजरो वऱ्हाड्यांच्या उपस्थितीत लगीनगाठ बांधून वैवाहिक जीवनाच्या क्षणाचे सौभाग्य ज्योतीला मिळण्यासाठी अनेकांचे हात पुढे आले व १० मे रोजी ज्योतीचा विवाह सोहळा थाटामाटात पार पडला.

## सुखी जीवनासाठी अनेकांच्या मनोकामना

**गिरोला येथे ज्योतीची लगीनगाठ बांधली जाऊन वैवाहिक जीवनात समाजसेवी व हजारो वऱ्हाड्यांच्या साक्षीने पदार्पण केले. वैवाहिक जीवन सुखी आनंदी जावो, अशी मनोकामना करुन आशिर्वाद देण्यासाठी आमदार विनोद अग्रवाल, सविता बेदरकर, डॉ. सचिन चौधरी, अनिल मेश्राम, भगवान नंदागवळी, मधुसूदन दोनोडे, मंदा कोसरकर, गप्पु गुप्ता, सुनील भरणे, संतोष डोंगरे, यशोदा सोनवाणे, नानन कटरे, आरती चवारे, वैशाली कोठेवार, डॉ. माधुरी नासरे, सीमा डोये, सुरेंद्र गौतम, वशिष्ठ खोब्रागडे, सुनीता भेलावे, दिव्या भगत, विश्वजीत बागडे, प्रमोद गुडधे, डॉ. नीता खांडेकर, धनेंद्र भुरले, मालती निनावे तसेच निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता सुमित बेलपत्रे आवर्जून उपस्थित होते.**

# साप चावा घेतला नंतर मांत्रिक कडे न जाता डॉक्टरांकडे जाण्यावर लक्ष द्या

पावसाळा (Monsoon) येताच साप चावण्याचे प्रकार देखील वाढतात. पावसाळा सुरू होताच काही सापांच्या प्रजननाचा काळ सुरू होतो. तर, मुसळधार पावसामुळं सापांच्या बिळात पाणी साचते. त्यामुळं पावसाळ्यात साप बिळातून बाहेर पडतात व राहण्यासाठी जागेचा आडोसा शोधतात. सुरक्षित जागेच्या शोधात अनेकदा साप घरातील अडगळीच्या खोलीत किंवा घराजवळच्या एखाद्या ठिकाणी आसरा शोधतात. अशावेळी अनावधनाने आपण तिथे जातो आणि साप डसतो.

सर्पदंश झाल्यानंतर अनेक जण घाबरुन जातात. गावाकडे अजूनही साप चावल्यानंतर एखाद्या बुवा-बाबाकडे किंवा मांत्रिकाकडे विष उतरवण्यासाठी नेण्यात येते. मात्र, या प्रकारामुळं एखाद्या व्यक्तीचा जीवदेखील जाऊ शकतो. साप चावा घेतला नंतर मांत्रिक कडे न जाता वैज्ञानिक तांत्रिक डॉक्टरांकडे जाण्यावर लक्ष देण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी केले आहे.

**सर्पदंश म्हणजे काय**

सर्पदंश ही सापांची इतर प्राण्यांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठीची संरक्षक यंत्रणा आहे विषारी साप चावण्याला सर्पदंश म्हणतात. याचा मज्जा संस्था, हृदय किंवा रक्त उत्पादक अवयवांवर परिणाम होऊ शकतो. जे वेळेत उपचार न केल्यास प्राण घातक ठरू शकते.

**याची मुख्य चिन्हे आणि लक्षणे काय आहेत**

जखमीच्या जागेवर दाताचे ठसे दिसतात.जखमेतून रक्त येते.सूज चाव्याच्या जागेवर किंवा अवयावर सूज येते.प्रभावित जागेच्या रंगात फरक दिसतो.चक्कर येतात. खूप घाम येतो. हृदयाची ठोके वाढतात. वाढलेली हृदयाची गती.

**सर्पदंश झाल्यास प्रथमोपचार कसा कराल**

सर्पदंश झाल्यावर तत्काळ वैद्यकीय मदत मिळणे शक्य नसते व ती मिळण्यापूर्वी केलेले उपचार म्हणजेच प्रथमोपचार होय. आतापर्यंत ब-याच सर्पदंशाच्या प्रकरणांत या प्रथमोपचारामुळेच किती तरी लोकांचे प्राण वाचलेले आहेत.त्यामुळे डॉक्टरांपर्यंत पोहोचेपर्यंत हा उपचार अत्यंत महत्त्वाचा आहे, तो कसा कराल?

**सर्पदंश झालेल्या व्यक्तीला धीर द्यावा.**

सर्पदंश झालेल्या व्यक्तीला सर्वप्रथम जमिनीवर झोपवावे. कारण जर तो व्यक्ती चालत-फिरत असेल तर विष शरीरात लवकर पसरते.

सर्पदंश झालेल्या व्यक्तीला घाबरवू नका त्याला हिंमत द्या. कारण घाबरल्यानंतर रक्तप्रवाह वाढतो अशाने शरिरात विष लवकर पसरते.

**पायी चालणे, जास्त बोलणे टाळावे.**

विषारी साप हाताला चावला असेल तर दंडाला दोरीने हलकेसे बांधावे जोरात आवळून नाही. ज्या व्यक्तीला सापाने दंश केला आहे त्याला घाबरवण्यापेक्षा शांत करण्याचा प्रयत्न करावा कारण घाबरल्यामुळे रक्ताभिसरण वेगाने होऊन विष संपूर्ण शरीरात पसरते. शरीराचा जो भाग सापाने चावला आहे तो भाग हृदयाच्या खाली ठेवण्याचा प्रयत्न करा आणि अजिबात हालचाल करण्याचा प्रयत्न करू नका. विषारी साप पायाला चावला असेल तर मांडीला दोरीने हलकेसे बांधावे जोरात आवळून नाही. आवळपट्टी



बांधताना दंड व दोरीच्या मध्ये पेन, काडी किंवा बोट चाकून बांधावे बांधल्यानंतर ते बाहेर काढावे. दर १५ ते २० मिनिटांनंतर बंद १५ सेकंदांसाठी सोडावा व पुन्हा त्याच पद्धतीने बांधावा. सर्पदंश झालेल्या व्यक्तीला चहा, कॉफी किंवा दारू पाजू नये. दंश झालेल्या जागेवर चिरा किंवा काप घेऊ नये त्यामुळे जास्तीचा रक्तस्राव होऊन व्यक्ती दगावण्याची शक्यता असते.

साप चावलेल्या व्यक्तीच्या हातावर किंवा पायावर बांधलेली कोणतीही वस्तू, जसे की घड्याळ, बांगडी, पायल, ब्रेसलेट किंवा पायल काढा. साधारणपणे साप चावल्यावर सूज येते, त्यानंतर या गोष्टी काढणे कठीण होते.

दवाखान्यात जातांना शक्यतो फोनवर डॉक्टरांना कळवावे जेणेकरून त्यांना तत्काळ मदत करता येईल. १०८/१०२ वर आपत्कालीन अँबुलन्स वाहन वर मदत घ्या. दंश झालेल्या व्यक्तीला दमा किंवा ॲलर्जी अथवा एकादा आजार असल्यास डॉक्टरांना कळवावे.

**सर्पदंश झाल्यास हे करू नका**

सापाचे विष मंत्राने उतरत नाही दंश झालेल्या व्यक्तीला मांत्रिकाकडे न नेता तत्काळ दावाखान्यात न्यावे, कारण सर्पदंशावर प्रतिसर्प विष हे एकमेव औषध आहे. म्हणून मांत्रिकाकडे नेऊ नका. सर्पदंश झालेल्या व्यक्तीला कडूलिंबाचा पाला, मिरची खायला देऊ नका यामुळे तुम्ही तुमचा बहुमूल्य वेळ वाया घालवता तसे करू नका. सर्पदंश झालेल्या जागेवर कोणतीही औषधी वनस्पती उगाळून लावू नका किंवा कोणत्याही बिया वगैरे खाण्यास देऊ नका. चाव्याजवळ कापड किंवा टर्निकेट घट्ट बांधू नका यामुळे रक्त परिसंचलन बंद होऊन गुंतागुंत वाढु शकते.

**रुग्णाला बेशुद्ध होऊन देऊ नका.**

साप चावलेल्या व्यक्तीला झोपण्यापासून थांबवा. सर्पदंश झालेली जागा/ घावावर बर्फ लावू नका. जखमेतून विष शोषून घेण्याचा प्रयत्न करू नका सर्पदंश झाल्यास धोत-याच्या बिया वगैरे खाण्यास देऊ नका. तसे केल्याने विषबाधा होत नाही, असा गैरसमज आहे. तसे करू नका. सर्पदंश झालेल्या जागेवर गरम केलेले लोखंड लावणे (डागण्या देणे) चुकीचे आहे तसे करू नका. सर्पदंश केलेला साप मारून अथवा जिवंत डॉक्टरांकडे नेऊन दाखवू नका. सर्पदंश होताना तो उलटला तरच विषबाधा होते हे चुकीचे आहे वेळ न दवडता तत्काळ दवाखान्यात जा. सर्पदंश झालेल्या जागेवर कोंबडीचे गुद्द्वार लावू नका. असे केल्याने विष उतरत नसते, तो गैरसमज आहे. सर्पदंश झाल्यास त्या सापास पकडून चावल्याने विष उतरते, असा गैरसमज आहे. तसे करू नका. अशा वेळी साप चवताळलेल्या अवस्थेत असल्याने तो आणखी चावा घेऊ शकतो. सर्पदंश झालेल्या व्यक्तीने एकट्याने दवाखान्यात न जाता सोबत सहकारी घेऊनच जावे.

दंश झालेल्या व्यक्तीने कोणतेही वाहन चालवू नये.सर्पदंश झाल्यास इतर सर्व उपाय हे निरर्थक व वेळ वाया घालवणारे आहे. त्यामुळे विषबाधित व्यक्तीच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्पदंशावर एकमेव उपाय म्हणजे प्रतिसर्पविष (स्नेक अँटिव्हेनिन) हेच होय, जे शासकीय सामान्य रुग्णालयात मोफत दिले जाते. ज्या केंद्रात विष प्रतिरोधक त्वरित मिळू शकेल अशा ठिकाणी त्या व्यक्तीला लगेच हलवा.

**सर्पदंशापासून वाचविण्यासाठी खालील उपाययोजना करु शकतात**

योग्य उपाय आणि सावधगिरी बाळगल्यास सर्पदोष रोखला जाऊ शकतो हे मृत्यू आणि विकृती कमीच करू शकते आणि रोखू शकते रात्री मशाल टॉर्च किंवा दिवा घेऊन बाहेर पडा. दाट गवतातून जाण्यापूर्वी जाड बुट आणि लांब पॅन्ट घाला. घराबाहेर पडताना लॉंग-बूटचा वापर करावा.

कोणताही दगड किंवा खडक हलविताना किंवा स्वयंपाक करण्यासाठी लाकूड गोळा करताना आणि डोंगराळ भागात फिरताना किंवा लहान तलावात आणि नद्यात पोहताना सावध राहा. दगडाच्या खाली, खड्ड्यात साप असण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळं अशा जागांवर कोणतीही छेडछाड करु नका. स्टोअर किंवा बेसमेंट मध्ये साप किंवा उंदीरासाठी योग्य रीपिलेंट वापरा हालचाल न करणारा किंवा अर्ध मेला वाटणारा साप पकडण्याचा प्रयत्न करू नका झोपेच्या आधी नेहमीच तुमचे अंथरूण तपासा आणि जमिनीवर झोपणे टाळा ज्यांची घरं शेतात असतील आणि ते जमिनीवर झोपत असतील तर त्यांनी झोपण्यापूर्वी मच्छरदाणीचा वापर करावा. पुढील कारणांपैकी एका कारणामुळे हे विष रक्त प्रवाहात प्रवेश करू शकत नाही. सापाच्या दंशात विष नसते. याला ड्राय बाईट म्हणूनही ओळखले जाते. संरक्षक कपडे किंवा बूट घातल्यामुळे सापाला चावा घेता येत नाही. काही कमी गंभीर प्रकारांच्या बाबतीत सापाच्या विषाची गळती होऊन जाते. कधी कधी दंश वरचेवर असतो आणि विष शरीरात प्रवेश करू शकत नाही .

**-डॉ. नितीन वानखेडे, जिल्हा आरोग्य अधिकारी**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# तहसीलदार किसन भदाणेला ७ वर्षात दुसऱ्यांदा लाच प्रकरणात अटक

**गोंदिया:–** जिल्ह्यातील गोरेगाव तहसील कार्यालयाचे तहसीलदार किसन भदाणे यांच्याकरीता लाच हा विषय गौण असून लाच मागण्यात व स्विकारण्यात भदाणे यांनी पु–र्वीपासूनच नावलौकीक मिळविले आहे. यापुर्वी २०१७ मध्ये सुध्दा ठाणे तहसीलदार पदावर कार्यरत असतांना सुमारे १० लााख रुपयाची लाच स्विकारल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल आहे. त्यामुळे गोरेगाव येथील वाळू व्यवसायीकाकडून १ लाख रुपयाच्या लाचेची मागणी करणे हे भदाणे यांच्यादृष्टीने गौण रक्कम च म्हणण्याची वेळ आली आहे.

गोरेगाव तालुक्यातील वाळू वाहतूक प्रकरणी गोरे–गाव तालुक्यातील गिधाडी या गावातील फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार तहसीलदार भदाने यांनी नायब तहसीलदार नागपुरे यांच्या माध्यमातून एक लाख रुपयांची मागणी केल्याची तक्रार आहे. यात गोरेगावचे तहसीलदार किशन के. भदाणे, नायब तह–सीलदार जी.आर.नागपुरे व एक खासगी व्यक्ती राजेंद्र गणवीर या तिघांवर ७,१२,१३,(१), (अ ) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सविस्तर असे की, ठाणे जिल्ह्यातील मीरा रोड येथील एका जमीन मालकाकडून दहा लाख रुपयांची लाच घेताना ठाण्याचे तहसीलदार आणि त्यांच्या एका साथीदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १८ ऑक्टोंबर २०१७ रोजी रंगेहाथ पकडले होते. मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील काशी गाव येथील सर्व्हे क्र. ५६, ५९ हिस्सा क्र. ३, ४, ६ या भूखंडाच्या मालकाने सदर भूखंड एन. ए. (अकृषिक) दाखला मिळण्यासाठी अर्ज केला होता.

हा दाखला मिळण्यासाठी ठाणे येथे तहसीलदार पदावर कार्यरत असतांना किसन भदाणे यांनी खासगी व्यक्तीमार्फत जमीन मालकाकडे दहा लाख रुपयांची मागणी केली होती.त्याप्रकरणात भदाणे यांना दहा लाख रुपये स्वीकारताना अटक करण्यात आली होती.

त्यानंतर पुन्हा ७ वर्षांनी एकदा भदाणे यांनी गोरेगाव येथे तहसीलदार पदावर कार्यरत असतांना वाळू व्यवसायीकास टिप्पर सोडण्यासाठी व या पुढे वाळूची वाहतूक सुरू ठेवण्यासाठी प्रती वाहन ५० हजार या प्रमाणे दोन्ही वाहनांचे रू १ लाख रुपये द्यावे लागतील असा निरोप खासगी व्यक्ती माफ र्फत दिला होता, त्यानुसार ही कारवाई करण्यात आली.विशेष म्हणजे ११ मार्च रोजी करण्यात आलेल्या तक्रारीवर ११,१२,१३ व १४ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली होती.





याप्रकरणात १ लाख रुपयांची लाचेची मागणी तहसील कार्यालय गोरेगाव येथे करण्यात आल्याचे सिद्ध झाल्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने ३ आरोपींना दि. ०७ मे रोजी रात्री ताब्यात घेऊन कारवाई केली.

# सर्व कागदपत्रे असतानाही जातवैधता प्रमाणपत्र नाकारले!

## उच्च न्यायालयाने जात पडताळणी समितीच्या सदस्यांना ठोठावला दंड

**नागपूर :** वैद्यकीय अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याला अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र नाकारल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गोंदियामधील जात पडताळणी समितीच्या सदस्यांवर पन्नास हजार रूपयांचा दंड ठोठावला आहे.

सर्व कागदपत्रे असतानाही प्रमाणपत्र नाकारल्याने न्यायालयाने दंड आकारण्याचा निर्णय घेतला. ही दंडाची रक्कम समितीच्या सदस्यांना चार आठवडयांत जमा करायची आहे. न्या. अविनाश घरोटे आणि न्या. मुकुलिका जवळकर यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला आहे. श्रेयस अजय घोरमारे (१७), असे याचिकाकर्त्या विद्यार्थ्याचे नाव असून तो नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालयामध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात शिकत आहे.श्रेयसचे वडील आणि बहिण यांच्याजवळ ङ्गमानाफ अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र आहे. श्रेयसने पंजोबा आणि आजोबांचे १९१४, १९१६ व १९४३ साली दिलेले ङ्गमानाफ अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रही सादर केले होते. श्रेयसकडे रक्त नात्यातील १६ जात वैधता प्रमाणपत्र आहे. इतके सारे वैध कागदपत्रे असताना जातवैधता पडताळणी समितीने श्रेयसला प्रमाणपत्र नाकारले. समितीने श्रेयसने सादर केलेल्या स्वातंत्र्यापूर्वीच्या जुन्या कागदपत्रांकडे चक्क दुर्लक्ष करून हे कागदपत्र विचारात न घेता त्याचा जात वैधता प्रमाणपत्राचा दावा नाकारला.

न्यायालयाने जातवैधता प्रमाणपत्राच्या या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. उच्च न्यायालयाने याप्रकरणी समितीवर ५० हजार रुपयांचा दंड आकारण्याचा निर्णय घेतला. याचिकाकर्त्या श्रेयसला चार आठवडयात ङ्गमानाफ अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र देण्याचे आदेशही समितीला दिलेत. याचिकाकर्त्यातर्फे ॲड. राम परसोडकर यांनी बाजू मांडली.



## ड्रोनद्वारे भूमापन होऊन मिळकतींचे चौकशी काम सुरु

**गोंदिया :** गोंदिया नगर परिषद हद्दीतील क्षेत्राचे नगर भूमापन करण्याकरीता महाराष्ट्र शास–नाचे २७ जुलै २०२० रोजीचे शासन निर्णयानुसार व जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख पूणे यांचे २७ एप्रिल २०२० रोजीचे पत्रानु–सार पथदर्शी प्रकल्पाकरीता निवड करुन ड्रोनद्वारे भूमापनाचे काम २ ऑक्टोबर २०२२ रोजी पूर्ण झालेले आहे.

पथदर्शी प्रकल्प नगर परिषद गोंदियाचे हद्दीमध्ये समाविष्ट गावातील क्षेत्राचे व हद्दीचे सीमा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. ड्रोनद्वारे भूमापन झालेल्या क्षेत्राचे नकाशे उप अधीक्षक भूमी अभिलेख गोंदिया कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर नकाशा डिजीटल फॉर्मेटमध्ये असल्याने त्यांचा वापर करण्याकरीता जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख पूणे यांचे कार्यालयाकडून आज्ञावली विकसित करुन प्रत्येक मिळकतींचे मालक/धारक यांची नोंद करुन आज्ञावलीद्वारे नकाशामध्ये प्रत्येक मिळकतींचा वेगळा नकाशा तयार केला जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक मिळकतींचे क्षेत्र किती आहे, त्यांची हद्द व मालक/धारक यांची नोंद होणार आहे. यामुळे शहर वासियांचे नागरी हक्काचे संवर्धन होईल, शहराचे रस्ते, शासनाच्या मिळकती, खुल्या जागा, नाले इत्यादींच्या सीमा निश्चित होऊन अतिक्रमण थांबविता येईल तसेच प्रत्येक मिळकत धारकांना त्यांचे हक्काचे पुरावे प्राप्त होतील. मिळकत धारकांना त्यांच्या मिळकतीवर कर्ज तसेच इतर सुविधा उपलब्ध होऊन नगर परिषदेची कर आकारणी, बांधकाम परवानगी यासाठी अभिलेख व नकाशा उपलब्ध होईल.

यासाठी उप अधीक्षक भूमी अभिलेख गोंदिया कार्यालयाकडून नगर परिषद हद्दीतील वार्ड क्र.९ ची निवड केली असून सदर वार्डामध्ये चौकशीचे काम सुरु आहे. तरी वार्ड क्र.९ मधील मिळकत धारकांनी आपल्या घरी/जागेवर कार्यालयाकडून येणा?्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. तसेच मिळकतींचे धारक/मालक ठरविण्याकरीता नागरिकांनी त्यांचे मालकीयत जमिनीचे पुरावे जसे– सातबारा, खरेदी खत, कर पावती, भोगवटा प्रमाणपत्र (पट्टा) तसेच आधारकार्ड, मोबाईल क्रमांक, ई–मेल आयडी इत्यादींची माहिती पुरवून शासनास सहकार्य करावे, असे उप अधीक्षक भूमी अभिलेख प्रमोद बोकडे यांनी कळविले आहे.

# अतिरिक्त सुरक्षा ठेव नियमानुसारच; भरणा करण्याचे महावितरणकडून वीज ग्राहकांना आवाहन

**नागपूर:.** ३० एप्रिल २०२४:– महावितरणच्या नागपूर परिमंडलातील वीजग्राहकांना एप्रिल अथवा मे महिन्यात वीजबिलांसोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्यासाठी स्वतंत्र बिल देण्यात येत आहे. ही अतिरिक्त सुरक्षा ठेव नियमान–ुसार असून त्याचा वीज ग्राहकांनी भरणा करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता–२०२१ च्या विनियम १३.१ नुसार वीजग्राहकांकडून सुरक्षा ठेव आकारण्यात येते. दरवर्षी सुरक्षा ठेवीची पुनर्गणना करण्यात येते. त्यानुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर ग्राहकांच्या मागील एका वर्षातील विनियम १३.११ नुसार ग्राहकाने भरलेल्या सुरक्षा ठेव रकमेवर रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित दरानुसार व्याजाची रक्कम (एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ साठी व्याजाचा दर ६.७५ टक्के आहे) वीजबिलाद्वारे समायोजित करून वीजग्राहकांना अदा करण्यात येते.

लघुदाब वीजग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम घरबसल्या भरण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर व महावितरणच्या मोबाईल ॲपवर सुविधा उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या बिलाची रक्कम भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

ग्राहकांच्या सरासरी वीजवापराच्या आधारे अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम निश्चित करण्यात येते. वीजग्राहकांना सुरक्षा ठेव ही मासिक बिल असेल, तेथे सरासरी मासिक बिलाच्या दुप्पट आणि त्रैमासिक असेल तेथे सरासरी त्रैमासिक बिलाच्या दीडपट घेण्याची तरतूद आयोगाकडून करण्यात आली आहे. उदा. एका ग्राहकाचा एकूण वार्षिक वीज वापर ६००० रुपये असेल. तर या ग्राहकाने सरासरीनुसार दोन महिन्याचे बिल म्हणजेच १००० रुपये सुरक्षा ठेवीपोटी महावितरणकडे भरणे बंधनकारक आहे. त्यानंतरच्या आर्थिक वर्षात या ग्राहकाचा वार्षिक वीज वापर ७२०० रुपये झाल्यास ठरलेल्या सूत्रानुसार व सरासरीप्रमाणे सुरक्षा ठेवीची रक्कम १२०० रुपये होईल. संबंधित ग्राहकाचे १००० रुपये पूर्वी जमा असल्याने त्याला सुरक्षा ठेवीपोटी वीज कंपनीकडे फक्त २०० रुपये अतिरिक्त भरावे लागतील. सुरक्षा ठेवीच्या अतिरिक्त रकमेचा भरणा करण्यासाठी नियमित वीज बिलाशिवाय स्वतंत्र बिल ग्राहकाला दिले जाते.

महावितरणकडे जमा असलेली सुरक्षा ठेव ही ग्राहकांचीच रक्कम असून वीज पुरवठा कायमस्वरुपी बंद करतेवेळी ही ठेव ग्राहकाला व्याजासह परत केल्या जाते. मुळात वीज ग्राहकांकडून घेण्यात येत असलेली सुरक्षा ठेव ही ग्राहकांच्याच कल्याणासाठी महावितरणतर्फे वापरल्या जाते, ग्राहकांना मिळणारे वीजेचे बील हे त्यांचा एक महिना आधी वापरलेल्या वीजेपोटी असते, म्हणजेच आधी वापर व त्यानंतर बील असा हा क्रम आहे. वीज बिल आल्यानंतरच ग्राहक ते भरत असतो. म्हणजेच वीज बिल आल्यानंतर ते भरण्यासाठी साध–ारणतः १८ ते २१ दिवसांचा कालावधी ग्राहकाकडे असतो. म्हणजे वितरीत केलेल्या विजेचे पैसे महावितरणकडे सुमारे दीड महिन्यानंतर येतात.

अश्या परिस्थितीत वीज वितरण कंपनीचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी वीज कायदा २००३ च्या कलम ४७ च्या उपकलम (५) व उपकलम (१) अन्वये सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांना वितरण कंपनीकडे सुरक्षा ठेव जमा करने बंधनकारक आहे. ग्राहकाला आर्थिक वर्षातील दोन महिन्याच्या सरासरी इतके वीजबिल सुरक्षा ठेव म्हणून वितरण कंपनी कडे जमा करावी लागते. त्यामुळे ग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा वेळीच भरणा करुन सहकार्य करावे असे आ–वाहन महावितरणने केले आहे.



## पॉस्को प्रकरणात आर–ोपीला १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**गोंदियाः–** अतिरिक्त व सत्र न्यायालयाचे मुख्य जिल्हा सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे यांनी अत्याचार व पॉस्को प्रकरणातील निकाल देताना आरोपीला १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.किशोर रामू शेंडे (रा.मोखे किन्ही, जि.भंडारा) असे आरोपीचे नाव आहे.

गोरेगाव येथील एक कुटूंब तिरोडा तालुक्यातील सर्रा येथे नातेवाईकाच्या लग्न समारंभात सहभागी झाले होते. विवाह सो–हळा आटोपल्यानंतर २३ एप्रिल २०१९ रोजी रात्रीच्या सुमारास आरोपीने मुलीला जवळील शेतात नेऊन अत्याचार करुन पळ काढला. याप्रकरणी मुलीच्या कुटूंबीयांनी तिरोडा पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपासाचक्र फिरवून आरोपी किशोर शेंडेला अटक केली व तपासाअंती न्यायालयात दोषार–ोपपत्र दाखल केले. खटल्याच्या सुनावनी दरम्यान किशोर शेंडेवर गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायाधीश ए. टी. वानखेडे यांनी आरोप–ीला भादंवि ३६३ नुसार २ वर्ष कारावास, १ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिने अधिक करावास, भादंवि ३५४ नुकसान ३ वर्ष कारावास, २ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास २ महिने अधिक कारावास तसेच भादंवि ३७६ (अ–इ) नुसार कारावास, ५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने अधिक करावास अशी शिक्षा ठोठावली आहे. न्यायालयात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील कृष्णा पारधी यांनी बाजू मांडली. पैरवी कर्मचारी म्हणून पोलिस हवालदार मोहन भोयर यांनी काम पाहिले.

# स्थलांतरित मजूरांनो बाहेर गावी कमविण्यासाठी जाताय

**गोंदिया:** जिल्ह्याची सीमा ही मध्य प्रदेश व छत्तीसगड राज्याला व गडचिरोली जिल्ह्याला लागून आहे. दरवर्षी जिल्ह्यातील मजूर हे तेंदू पत्ता, पत्ता सीजन, बास कटाई, बांधकाम, रस्ता कामे व इतर विविध काम ानिमित्त स्थलांतरित करीत असतात. परंतु तिथे गेल्याने आपल्या आरोग्याची काळजी न करता दिवस रात्री कामे करुन उघड्यावरती झोपत असतात. गोंदिया लागून असलेल्या सीमा भागात जंगलव्याप्त भाग असल्याने परतीच्या वेळी येताना आजारी किंवा हिव–ताप संसर्ग घेऊन येण्याची शक्यता असते.

तरी परतीच्या वेळी आल्यानंतर कुठलेही ताप सदृश्य किंवा इतर लक्षणे आढळून आल्यास शासकीय आरोग्य संस्थेमध्ये जावे तसेच गावपातळीवर आशा स्वयंसेविके जवळ हिवताप चाचणी संबंधाने आर डी के. (जलद ताप सर्वेक्षण कीट) उपलब्ध आहे. तरी कुठलाही ताप कमी न समजता रक्ताची तपासणी करून घेण्याबाबतचे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांनी केले आहे.

स्थलांतरित मजूरांनो सावधान कुठलाही ताप घातक जीवघेणा ठरु शकतो. बाहेर कमवायला जाण्या अगोदर कार्यक्षेत्रातील आरोग्य कर्मचारी, आशा सेविका यांना माहिती देवुन हिवताप प्रतिबंधात्मक औषधी डोज अवश्य घेवुन जा.

हिवताप सदृश्य कुठलीही लक्षणे जसे ताप, सर्दी ,अंगदुखी, मळमळ, उलटी, जुलाब, हगवण व अतिसार इत्यादी लक्षणे दिसल्यास कुठल्याही भोंदुबाबा किंवा अप्रशिक्षित,पदवी नसलेल्या डॉक्टरांना न दाखवता जवळच्या शासकीय दवाखान्यात जाऊन तपासणी करण्याचे आव्हान जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे यांनी केले आहे.

## कमी पटसंख्येच्या शाळांच्या समायोजनास स्थगीती द्या-माजी मंत्री बडोले

**अर्जुनी मोरगाव–** गोंदिया जिल्ह्यातील शाळांच्या UDISE २०२३–२४ च्या स्थितीनुसार १ ते २० पटसंख्या असलेल्या शाळा बंद करुन नजीकच्या मोठ्या शाळेत समायोजन करा.या निर्णयाला स्थगीती देवुन जैसे थे ठेवण्यात यावे,अशा आशयाचे निवेदन माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी राज्याच्या शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन यांना देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची जाणीव करुन देत सविस्तर चर्चा केली.



विशेष म्हणजे दि.१२/४/२०२४ ला मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांनी पत्र काढुन २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा नजीकच्या मोठ्या शाळेत समायोजन करण्याबाबत मुख्याध्यापकांना पत्र दिले.

यात जिल्ह्यातील १८५ शाळा समाविष्ट आहेत. या शाळा अतिशय दुर्गम भागातील व बहुतांश आदिवासी ग्रामीण भागातील असल्याने सदर शाळा बंद झाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास होईल. त्यांना बाहेर जाण्याचा त्रास होऊन परीणामी त्यांचे शिक्षणात खोळंबा होईल याची जाणीव ठेवून सदर शाळा पुर्ववत सुरू ठेवण्यात यावे याबाबत माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी प्रधान सचिव यांच्या लक्षात सदर बाब आणून दिली. प्रधान सचिव कुंदन यांनी याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

# शिक्षण,आरोग्य,विजेच्या प्रश्नावर आप करणार आंदोलन

**गोंदिया**–सध्या देशात लोकसभा निवडणुकीचे वारे सुरु असून भंडारा–गोंदिया लोकसभा मतदारसंघातही इंडियाआघाडीच्या उमेदवारासह दे–शात इंडिया आघाडी मोठ्यासंख्येने लोकसभेच्या जागा जिंकणार आहे.आमच्या पक्षाने गोंदिया जिल्ह्यात इंडिया आघाडीसोबत लोकसभेत काम करीत असतांना आजही शिक्षण,आरोग्य,विज व पाण्याचे प्रश्न ग्रामीण भागात कायम असल्याचे निदर्शनास आले.त्यामुळे येत्या काळात आम आदमी पार्टीच्यावतीने जिल्ह्यात शिक्षण,आरोग्य,विज व पाण्याच्या प्रश्नावर मोठे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आम आदमी पार्टीचे तालुका प्रमुख शैलेष बैस यांनी पत्रपरिषदेत दिली.



यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश दमाये,मिलन चौधरी आदी पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी बैस यांनी गोंदिया जिल्ह्यात प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा ग्रामपातळीवर चांगल्या दर्जासह असायला हव्यात,मात्र त्या नाहीत त्यातच सरकार खासगीकरणाच्या माध्यमातून सरकारी शाळा बंद करण्याचा घाट घालत असल्याने ग्रामीण भागातील शेतकरी,शेतमजूरांना आपल्या पाल्यांना चांगले शिक्षण देणे अवघड झाले आहे.तर आरोग्याच्या पाहिजे तशा सुविधा अद्यापही उपलब्ध नाहीत.तर सध्या प्रधानमंत्री यांची महत्वाकांक्षी योजना जलजीवन मिशन ही जिल्ह्यात सुरु आहे.या योजनेत मोठ्या प्रमाणात गौडबंगाल असून कोट्यवधीचा निधी मिळूनही गुणवत्ताहीन कामे केली जात असल्याचा आरोपही बैस यांनी पत्रकार परिषदेत केला.

# अखेर अकरा वर्षाच्या प्रदीर्घ प्रतिक्षे नंतर डॉ दाभोलकर खुनाचा निकाल

## निकालाचे स्वागत पण कार्यकर्त्यांची अस्वस्थता

**पुणे :** अकरा वर्षाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर महाराष्ट्र अंधश्रद्ध निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाचा निकाल जाहीर झाला आहे. सचिन अंदुरे, शरद कळसकर यांना पुणे येथील सेशन कोर्टात न्यायमूर्ती पी. पी. जाधव यांनी जन्मठेपेची व पाच लाख रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. खुनाच्या प्रकरणातील मोहरक्या डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, हिंदू विधीज्ञ संघटनेचे प्रमुख संजीव पुनाळेकर व विक्रम भावे यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

निकालाचे आम्ही स्वागतच करीत आहोत. पण त्याला खूप विलंब झाला आहे. याबद्दल आम्ही खेद व्यक्त करीत आहोत. या निकालाबाबत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पूर्णतः असमाधानी आहे. या निकालातून हे स्पष्ट दिसून येते की, तपास यंत्रणा मुख्य सूत्रधारापर्यंत पोचलीच नाही. त्यानंतरचा जो सूत्रधार डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पून्हाळेकर आणि विक्रम भावे यांच्यासंबंधी पुरावे जमा करण्यात तपास यंत्रणा अपुरी पडली आहे. यंत्रणा राजकीय दबावापुढे झुकली आहे. त्यातूनच सूत्रधार हे निर्दोष सुटले. निकालाची प्रत हातात मिळताच त्यावर संघटनेत विचार विनिमय करून पुढील दिशा ठरवता येणार आहे. पुढील काळात न्यायालयात आणि जनतेच्या न्यालायात आम्ही आमची बाजू घेवून लढू.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या आध–ारे समाजाला विवेकी बनवणे, धर्माची कठोर पण विधायक चिकित्सेचा आग्रह धरणे, सर्व धर्मातील अंधश्रध्दा व शोषणा विरुद्ध जनजागरण करीत होते. भारतीय संविधानाचा मूल्यआशय आणि संत समाजसुधारकांच्या कृतिशील विचाराचा वारसा जनसामान्यात रुजवने, शोषण व अंधश्रध्दा मुक्त चिकित्सक समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने काम सुरू होते. त्यातच २०१३ साली डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा खून झाला. आजही संघटनेचे काम सुरू आहे. स्वयंस्फूर्तीने आणि लोकसहभागातून काम करणाऱ्या असंख्य कृतिशील कार्यकर्त्यांचा प्रतिसाद मिळत गेला. प्रसार माध्यमांचे पाठबळ मिळाले. त्यामुळे महा. अंनिस ही एक लोकचळवळ बनली. धर्मांध, सनातनी प्रवृत्तींना हे काम रुचले नाही. विचारांचा



प्रतिवाद विचाराने करता आला नाही, त्यामुळे २० ऑगस्ट २०१३ रोजी डॉक्टर मॉर्निंग वॉकला गेले असता महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर त्यांच्यावर मागून गोळ्या झाडून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली.

तत्कालीन पोलिसांनी खून प्रकरण गांभीर्याने घेतले नाही, त्यामुळे पुणे पोलिसांकडून तपास भरकटत गेला. त्यानंतर १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कॉ. गोविंद पानसरे यांच्यावर त्याच पद्धतीने गोळ्या झाडल्या गेल्या. त्यांचा २० फेब्रुवारी २०१५ रोजी मृत्यू झाला. ३० ऑगस्ट २०१५ रोजी हंपी विद्यापीठाचे कुलगुरू एम एम कल्बुर्गी तर ५ सप्टेंबर २०१७ रोजी पत्रकार गौरी लंकेश यांचे त्याच पद्धतीने खून झाले. यातील सर्व व्यक्तींचे वय ६५ ते ७० पेक्षा जास्त होते. या खुनाचा तपास अनुक्रमे पुणे पोलिस, मुंबई पोलिस, ए टी एस, सीबीआय यांच्या माध्यमातून न्यायालयाच्या निगराणी खाली सुरू राहिला. खून झाले तेव्हाच तपास पूर्ण होवून मारेकऱ्यांना शिक्षा झाली असती तर पुढील तीन खून टळले असते.

खुन प्रक्रियेतील मोहरक्या सनातनचा साधक असलेला डॉ. वीरेंद्रसिंह तावडे यांस १० जून २०१६ रोजी प्रथम अटक झाली. त्यानंतर सचिन अंदूरे, शरद कळसकर यांचे विरुद्ध २०१८ मध्ये पुरवणी अरोपत्र दाखल झाले. आयपिसी ३०२, १२०, ३४, आर्म ॲक्ट कलम ३(२५), यूएपिए कलम १६ प्रमाणे दोषी ठरवले. केस क्र ६०२२/२०१६ नुसार गुन्हा नोंद झाला. तर हिंदू विधीज्ञचे प्रमुख ?ड. संजीव पुनाळेकर, विक्रम भावे यांना २०१९ मध्ये आयपिसी २०१ प्रमाणे पुरावा नष्ट करण्याच्या कलमाखाली आरोपपत्र दाखल होवून अटक झाली. सी बी आय ने दरम्यानच्या काळात ३२ साक्षीदारांचे जबाब नोंदवले आहेत. या कामी ॲड प्रकाश सूर्यवंशी हे सरकार तर्फे कामकाज पाहत होते, तर वॉचब्रिफ म्हणून ॲड अभय नेवगी काम पाहत होते. या दरम्यानच्या काळात महा. अंनिसने वेगवेगळ्या पातळीवर विविध प्रकारे निदर्शने, धरणे, मोर्चे उपोषणे, हिंसा के खिलाफ़, मानवता की ओर, रक्तदान अशा आंदोलनातून राज्य व केंद्र सरकार यांचेकडे पाठपुरावा करीत जनतेच्या न्यायालयात सातत्याने दाद मागितली. आता तब्बल ११ वर्षानंतर हा निकाल हाती आला आहे, त्याचे स्वागतच आहे. परंतु फारच उशीर झाला आणि सूत्रधार सुटले, ही कार्यकर्त्यांची खंत आहे.

मारेकऱ्यांना जी काही शिक्षा झाली. यावर आम्ही समाधानी नाही. आरोपातून मुक्त झालेल्या तिघांना शिक्षेपर्यंत पोचविण्यासाठी सरकारने अपील दाखल करावे, यासाठी संघटना आग्रही राहील. खुनाच्या मास्टर माईडपर्यंत अजू–नही तपास यंत्रणा पोचली नाही. तोपर्यंत आणखी विचारवंतांच्या तसेच चळवळीच्या शिर्षस्थ कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका आहे. म्हणून ही लढाई इथेच संपत नाही, तर त्याचा पाठपुरावा करावा लागेल.

निकालाच्या वेळी न्यायालयात महा. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य सरचिटणीस ॲड रंजना गवांदे, पुणे शहर कार्याध्यक्ष विशाल विमल, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड, पिंपरी चिंचवड शहर शाखा कार्याध्यक्ष विकास सूर्यवंशी, ॲड. अरबाज पटेल, ॲड. परिक्रमा खोत यावेळी उपस्थिती होते.

# तिघींनी दिला गोंडस बाळांना जन्म

## कुऱ्हाडी आरोग्य केंद्रात एकाच दिवशी यशस्वी प्रसूती, माता बालक दोघे ठणठणीत



**गोंदिया:** तालुक्यातील ग्राम कुऱ्हाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शनिवारी (दि.११) तब्बल तीन यशस्वी प्रसूती करण्यात आल्या असून यातील तिघा मातांनी गोंडस बाळांना जन्म दिला आहे. तिघी माता व त्यांचे बालक ठणठणीत आहेत.

आरोग्य केंद्र पहिली प्रसुती पहाटे ५.४५ वाजता ग्रा बघोली येथील रहिवासी रिता संजय उके यांची, दुसरी प्रसुती सकाळी ११.०५ वाजता ग्राम कुऱ्हाडी येथील रहिवासी विद्या प्रमोद पटले यांची तर तिसरी प्रसुती दुपारी २.४५ वाजता ग्राम हिरापूर येथील रहिवासी प्रिया अंकुश मारबदे यांची करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किर्तीकुमार चुलपार व डॉ. अमित मजुमदार यांच्या मार्गदर्शनात यशस्वी प्रसुती करण्यात आली असून तिघी माता व बालकांची प्रकृती ठणठणीत असून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या निगराणीत आहे.

तीनही प्रसुतीसाठी आरोग्य सेविका ललिता पटले व बिसेन तसेच आशा सेविका नलिनी रामटेके, गीता पटले, ममता बिसेन व मदतनीस साधना मेश्राम यांनी मोलाची कामगिरी पार पाडली. या भरीव आरोग्य सेवेबद्दल प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व त्यांच्या संपूर्ण टीमचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंद वाघमारे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. रोशन राऊत यांनी कौतून केले आहे.

माता व बाल आरोग्य कार्यक्रम अंतर्गत सर्व प्राथमिक केंद्राची आपल्या कर्तव्य व जबाबदारीचे भान ठेवून नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी झटत राहून आरोग्य सेवा प्रदान करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

### गंगाबाई रुग्णालयाचा ताण कमी होणार

**येथील बाई गंगाबाई महिला रुग्णालयात जिल्ह्यासह लगतच्या मध्यप्रदेश व छत्तीसगड राज्यातील महिलासुद्धा प्रसुतीसाठी येतात. परिणामी रुग्णालयावर ताण पडतो. अशातूनच कित्येकदा गर्भवती महिलांची गैरसोयही होते. मात्र आता आरोग्य केंद्रामध्येच यशस्वीरित्या प्रसुती होऊ लागल्यास गंगाबाई रुग्णालयावरील ताण नक्कीच कमी होणार यात शंका नाही.**

# तिघांना जिवंत जाळणाऱ्या आरोपीला फाशी

## जिल्हा न्यायालयाचा निर्वाळा

**गोंदिया :** पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवून पत्नीसह मुलगा व सासऱ्याला पेट्रोल टाकून जिवंत जाळणाऱ्या आरोपीला आज (ता.९) जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी धरत फाशीची शिक्षा ठोठावली आहे. किशोर श्रीराम शेंडे रा.भिवापूर ता.तिरोडा असे आरोपीचे नाव आहे.

सविस्तर असे की, पत्नीच्या चरित्र्यावर संशय घेवून तिचा नेहमी छळ करीत असे. या जाचाला कंटाळून किशोर शेंडे याची पत्नी आरती शेंडे फेब्रुवारी २०२३ मध्ये रामनगर पोलिस ठाणे हद्दीतील सुर्याटोला येथे माहेरी आली होती. दरम्यान १४ फेब्रुवारीला आरोपीला किशोर शेंडे भिवापूर वरुन दुचाकी एका कॅनमध्ये पेट्रोल घेवून सुर्याटोला येथे आला. रात्रीची वेळ बघून त्याने घरावर पेट्रोल ओतले. तसेच पत्नी ज्या खोलीत झोपली होती तिथेही पेट्रोल टाकून घराला आग लावली.

या आगीत देवानंद सितकू मेश्राम (५२), आरती किशोर शेंडे व जय किशोर शेंडे (०४) या तिघांचा जळून मृत्यू झाला. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला तसेच प्रकरणाचा तपास पूर्ण करून प्रकरण न्याय प्रविष्ट केले. प्रकरणाची सुनावणी ७ मे रोजी पूर्ण होऊन न्यायमुर्ती एन.बी.लवटे यांनी पुरावे व साक्ष तपासून आरोपीला दोषी धरले.

दरम्यान (ता.९) या प्रकरणाचा निर्वाळा करीत भादंवि कलम ३०२ अंतर्गत फाशीची शिक्षा, कलम ४३६ अन्वये आजन्म कारावास व १० हजार रूपयाचा दंड अशी शिक्षा ठोठावली. या प्रकरणी सरकारी पक्षातर्फे ॲड.विजय कोल्हे यांनी बाजु मांडली. तर रामनगर पोलिस ठाण्यातंर्गत पैरवी अधिकारी म्हणून पोहवा देवानंद काशिकर यांनी काम बघितले. विशेष म्हणजे, जिल्हा निर्मितीनंतर पहिल्यादाच एखाद्या आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे.




### आत्याकडे गेल्याने बचावली स्वरांजली

**आरोपी किशोरची मुलगी स्वरांजली ही घटनेच्या दिवशी आपल्या आत्याकडे झोपायला गेली होती. त्यामुळे ती या घटनेतून बचावली. आरोपीची सासू ममता मेश्राम आपल्या नवीन घराचे बांधकाम सुरु असल्याने तिकडेच होत्या. त्यामुळे या घटनेत त्यांचाही जीव वाचला.**

### आरोपीविरुद्ध मिळाले ठोस पुरावे

**देवानंद सीतकू मेश्राम (५२) यांना पक्षाघात असल्यने ते पडवीतील खाटेवर झोपले होते. त्यांच्या अंगावर किशोरने पेट्रोल टाकले व घराच्या दरवाज्याच्या फटीतून घरात पेट्रोल ओतले. पेट्रोल टाकल्यानंतर किशोरने दाराची कडी वाजविली. त्यावर आरती शेंडे हिने दार उघडताच आरोपीने माचीसची काडी पेटवून पेट्रोलवर टाकल्याने भडका उडाला. आरोपीला १६ फेब्रुवारी २०२३ ला अटक करुन त्याचा मोबाइल जप्त करण्यात आला. पेट्रोलसाठी नेलेली १० लिटरची कॅन, आगपेटी तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी क्र.एमएच ३५, झेड ९७०४ जप्त करण्यात आली. आरोपीने गुन्हा करताना परिधान केलेले कपडेही जप्त करण्यात आले. श्री साई इंडियन ऑईल पेट्रोलपंप, चुरडी येथून आरोपीने पेट्रोल खरेदी कल्याचे येथील सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळले. उपलब्ध साक्ष, पुरावे, आरोपीकडून हस्तगत मुद्देमाल, उपलब्ध वस्तुनिष्ट पुराव्यांवरुन तो दोषी असल्याचे सिद्ध झाले.**

# विदेशी बनावटी पिस्तुल बाळगणाऱ्यास पिस्तुल व ५ जिवंत काडतूसासह अटक




**गोंदिया :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई करीत श्रीनगर, चंद्रशेखर वॉर्ड येथील विक्रांत उर्फ़ मोनु गौतम बोरकर यास विदेशी बनावटीची पिस्तुल, मॅगझिन व ५ जिवंत काडतूसासह जेरबंद केले.

पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या निर्देश मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १० मे २०२४ रोजी गुप्त मिळालेल्या माहितीनुसार श्रीनगरातील चंद्रशेखर वॉर्ड येथील इसमांकडे अग्निशस्त्र असून तो त्याची विल्हेवाट लावणार असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीची सत्यता पडताळून कारवाई केली असता, विक्रांत उर्फ़ मोनु गौतम बोरकर वय २,राहणार श्रीनगर, चंद्रशेखर वॉर्ड, गोंदिया याच्या राहते घरी विदेशी बनावटीची पिस्तूल, मॅगझिन, आणि ५ जिवंत काडतुसासह अवैधरित्या प्रतिबंधित अग्निशस्त्र मिळाल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले.पिस्तूल बाळगण्याबाबत विचारणा, चौकशी केली असता त्याने समर्पक असे कोणतेच उत्तर न दिल्याने त्याचेविरूध्द पोलीस ठाणे गोंदिया शहर येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, सहकलंम १३५ मपोका अन्वये अप.क्र.२९६/२०२४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. गुन्हेगार आरोपी यास जप्त पिस्तुल मुद्देमालसह गोंदिया शहर पोलीसांचे स्वाधीन करुन अटक करण्यात आली आहे.

पुढील कायदेशीर कारवाई तपास गोंदिया शहर पोलिस करीत आहेत. सदरची कारवाई वरिष्ठांचे निर्देशान्वये पोलीस निरीक्षक दिनेश लबडे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे स. पो. नि. विजय शिंदे, पो. उप. नि. महेश विघ्ने, म.पो.उप.नि. वनिता सायकर, पो.हवा.राजु मिश्रा, महेश मेहर, चित्तरंजन कोडापे, तुलसी लुटे, नेवालाल भेलावे, इंद्रजित विसेन, रियाज शेख, पो. शि. संतोष केदार, यांनी कारवाई केलेली आहे.

# अंडरग्राऊंड परिसरात होतेय वाहतूक कोंडी

## उड्डाणपुलाचे काम संथ गतीने, शहरवासीयांना बसतोय फटका



**गोंदिया:** शहरातील गोंदिया-बालाघाट मर्गावरील रेल्वेने ७० वर्षापुर्वी तयार केलेला उड्डारपुल धोकादायक असल्याने त्या पुलावरील वाहतूक पूर्णत: बंद करुन पुल तोडण्यात आला. नवीन पुलाचे काम संथ गतीने सुरु आहे. नवीन पुलावरुन येते म्हटले तर अर्धा किमी अंतर कापून जावे लागते. ते टाळण्यासाठी रामनगरकडे जाणारे नागरिक अंडरग्राऊंडा मार्गाचा अवलंब करीत आहेत. मात्र हा मार्ग अरुंद असल्याने येथे वाहनांच्या रांगा लागतात. सायंकाळी तर अक्षरश: अर्धा किमीपर्यंत वाहनांची रांग राहत असल्याने वाहनधारक वैतागले आहेत.

गोंदिया शहरातून मुंबई-हावडा रेल्वे मार्ग गेला आहे. गोंदिया रेल्वेस्थानक जंक्शन म्हणून नावारुपास आले आहे. देशाच्या चारही बाजूला येथून रेल्वेगाड्या धावतात. रेल्वे मार्गामुळे गोंदिया शहर दोन भागात विभागले गेले. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी ७० वर्षापुर्वी उड्डाणपूल तयार करण्यात आला होता. गेली ७० वर्षे तो पुल वाहतुकीच्या अव्याहतपणे भार वाहत होता. पुल जीर्ण झाला असून त्यावर भेगा पडल्या होत्या. कोणत्याही क्षणी मोठी हानी होण्याची शक्यता असल्यामुळे पुलावरील वाहतूक बंद करण्याचे पत्र २०१४ मध्ये रेल्वे प्रशासनाने जिल्हा प्रशासनाला दिले होते.

गांभीर्य बघता नवीन पर्यायी पुल तयार करण्यात आला. परंतु तो पुल सदोष असल्यामुळे संपूर्ण वाहतूक त्या पुलावरुन वळविणे धोक्याचे असल्याने जुन्या पुलावरुन वाहतूक सुरुच ठेवण्यात आली. रेल्वेने निर्वाणीचा इशारा दिल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी जुन्या पुलावरील वाहतूक बंद करण्याचे आदेश काढले.

### नवीन पुलाच्या कामाची गती वाढविण्याची गरज

**नवीन पुलाचे बांधकाम संथ गतीने सुरु आहे. त्यामुळे शहरवासीयांच्या अडचणीत भर पडली आहे. शहरात या भागातून त्या भागात जायचे असल्यास पाल चौक, रामनगर परिसरात जाणाऱ्यांना अधिकचे अंतर कापून जावे लागत असल्यामुळे ते भुमिगत पुलाचा अवलंब करित आहेत. मात्र, हा मार्ग निमुळत असल्याने आणि वाहतुकीचा भार वाढल्यामुळे येथे वाहनांची मोठी गर्दी होत आहे. सायंकाळी या मार्गावर अर्धा किमीपर्यंत रांग लागत आहे. त्यातच यादव चौकात पुलाचे काम सुरु असल्यामुळे अधिकच वाहतूक कोंडी होत आहे.**

# जास्तीत-जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करु-विनोद अग्रवाल



**गोंदिया:** गेल्या तीन-चार दिवसांत झालेल्या मुसळधार गाऊस, गारपीट आणि वादळामुळे रब्बी हंगामात लागवड केलेल्या उभ्या व काढणी केलेल्या भात पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाण वाळविण्यासाठी साठवून ठेवलेली पीके पूर्णपणे तयार असतानाही कोंब फुटल्याने नष्ट झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाचा घास हिसकावला गेला आहे. यावर आमदार विनोद अग्रवाल यांनी अधिकाऱ्यांसह नुकसानग्रस्त भागातील शेतात जाऊन पिकांच्या नुकसानीचा आढावा घेतला. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यंना जास्तीत-जास्त भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन दिले.

काही दिवसांपुर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे क्षेत्रातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यावर चाबी संघटनेच्यावतीने आमदार अग्रवाल यांनी उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील व तहसीलदार समशेर पठाण यांची भेट घेऊन अर्जाद्वारे पंचनामा करण्याची मागणी केली होती. त्यामुळे पटवारी, कृषी विभाग, महसूल विभाग व सर्व संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना नुकसानीची आकडेवारी पंचनामा करुन सादर करण्याचे आदेश यापुर्वीच देण्यात आले आहेत. त्यात आता आणखी अवकाळी पाऊस बरसला असल्याने आमदार अग्रवाल यांनी स्वत: शेतात जाऊन पाहणी केल्याने पंचनामा प्रक्रियेला आणखी गती मिळाली आहे.

यावेळी मोठ्या प्रमाणात झालेल्या पिकांच्या नुकसानीबाबत अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामा करुन शासनाकडे पाठविण्याचे आदेश देण्यात आले. तसेच सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नुकसानीची माहिती संबंधित कर्मचाऱ्यांना द्यावी, नेहमीप्रमाणे यावेळी ही झालेल्या नुकसानीवर एकत्र उभे राहून सरकारकडून जास्तीत-जास्त भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करु, असे आश्वासन आमदार अग्रवाल यांनी दिले आहे.

## टेकाटोला दंडारी येथील साठवण बंधाऱ्याचे बांधकाम सुरु झालेले नाही

**गोंदिया:** सालेकसा तालुक्यातील टेकाटोला दंडारी येथे मृद व जलसंधारण (लोकल सेक्टर) उपविभाग, सालेकसा यांचे नियंत्रणाखाली गेटेड साठवण बंधाऱ्याचे नविन बांधकाम मंजूर असून सद्यस्थितीत खोदकाम सुरु आहे, कोणत्याही प्रकारचे बांधकामास सुरुवात केलेली नाही. सदर बांधकामासाठी योग्य गुणवत्तेची रेती, सिमेंट (एसीसी ५३ ग्रेड), लोखंड इत्यादी साहित्य सामुग्रीचा साठा करण्यात आलेला आहे. बांधकामाला सुरुवात होणार असून प्रत्यक्ष बांधकाम सुरु झालेले नाही. मृद व जलसंधारण विभागाकडून कामावर नियमितपणे देखरेख सुरु आहे. जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामावर भेट देऊन सदर बंधाऱ्याचे बांधकामात योग्य गुणवत्ता राखण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर साठवण बंधाऱ्याचे योग्य साहित्याचा वापर करुन गुणवत्तापूर्ण बांधकाम केले जाईल. अशी माहिती उपविभागीय जलसंधारण अधिकारी पी.डी.मडावी, मृद व जलसंधारण उपविभाग सालेकसा यांनी दिली आहे.

# कृषि विभागामार्फत बियाणे, खते व किटकनाशके नियंत्रण कक्ष स्थापन

गोंदिया: जिल्हयात खरीप हंगामात गुणवत्तापूर्ण बियाणे, खते व किटकनाशकाचा पुरवठा व निविष्ठांचा काळाबाजारावर प्रतिबंधासाठी तसेच शेतकऱ्यांचे फसवणुक होत असल्याचे निदर्शनास आल्यास शेतकऱ्यांनी कंट्रोल रुम (नियंत्रण कक्ष) मध्ये तक्रार दाखल करावी आडे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, हिंदुराव चव्हाण यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणीबाबत त्यांच्या समस्यांचे निराकरण नियंत्रण कक्षात करण्यात येणार आहे. बियाणे, खते व किटकनाशकांची खरेदी करतेवेळेस शेतकऱ्यांना विविध अडचणी येतात. या अडचणी सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांनुसार जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नियंत्रण कक्षात शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी व निविष्ठांची गुणवत्ता, किंमत, साठेबाजी व लिकींगबाबत असलेल्या प्रत्येक तक्रारीचे निवारण करण्यात येणार आहे.

जादा दराने खताची विक्री होत असल्यास बियाणे, खते खरेदीचे बिल मिळत नसल्यास शेतकऱ्यांनी आपल्या नावासह व संपूर्ण पत्ता, तक्रारीचे स्वरुपयांची माहिती देऊन निवारण कक्षात तक्रार नोंदवावी, असे त्यांनी सांगितले.

नियंत्रण कक्ष (कंट्रोल रुम) १५ मे ते १५ ऑगस्ट या कालावधीत दररोज सकाळी १०.०० ते संध्याकाळी ७.०० या वेळेत सुरु राहील. नियंत्रण कक्ष संपर्काचा भ्रमणध्वनी क्रमांक ७४९९२५१३४३ असा असुन हा क्रमांक तक्रार नोंदविण्यासाठी डेडिकेट करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना तक्रार करावयाची असल्यास सदर क्रमांकावर तक्रार नोंदवावी. सदर तक्रारीची तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येईल असे कृषी विभागाने कळविले आहे.

# शहरातील नाल्यांवर अतिक्रमण, प्रशासनाचे दुर्लक्ष



**गोंदिया:** शहरात मोठ्या प्रमाणात वसाहतीकरण होत असल्याने जमिनीचा एक एक तुकडा महत्त्वाचा ठरत आहे. मिळेल त्या ठिकाणी बांधकामे करून घरे, इमारती, पत्राशेड बांधले जात आहेत.

लोकवस्ती वाढीच्या या चढाओढीत तसेच, काँक्रीटच्या स्मार्ट सिटीत अनेक नैसर्गिक नाले गायब झाले आहेत. नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे तसेच, क्षणिक फ़ायद्यासाठी शहराचा नैसर्गिक समतोल बिघडविला जात असल्याचे पाहायला मिळत आहे.

शहरात शेतजमीनवर घरे उभी राहत आहेत. मिळेल तेथे मोठ्या संख्येने इमारती उभ्या राहत आहेत. अर्धा-एक गुंठा जागेत तीन ते चार मजली इमारती उभ्या राहत आहेत. तर, हाऊसिंग सोसायटीसाठी टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. जुन्या इमारती तोडून उंच इमारती बांधण्यात येत आहेत. नाल्याच्या कडेने भराव टाकून सपाटीकरण केले जाते. अतिक्रमण करून त्या ठिकाणी इमारती, घरे निर्माण केले जाते. शहरात पूर्वी ७० किलोमीटरपेक्षा अधिक लांबीचे नाले होते, असे जाणकार सांगतात. नाल्याची नगरपरिषदेतर्फे पावसाळ्यापूर्वी साफ सफाई केली जाते. शहरात लहान मोठे मोठ्या प्रमाणात जास्त नैसर्गिक नाले आहेत. मात्र शहरात अनेक ठिकाणी नाले बुजविण्यात आले आहेत. तसेच, नाले बुजवून तेथे भूमिगत पाईप टाकण्यात आले आहेत. नाल्यावर अतिक्रमणे झाले आहेत. नाले गायब झाल्याने तसेच, नाल्याचे पात्र अरूंद झाल्याने जलवाहिनी, ड्रेनेजवाहिनी आदी वेगवेगळ्या प्रकाराचे अडथळे निर्माण झाल्याने पावसाळ्यात पाणी जाण्यास मार्ग राहत नाही. परिणामी, लोकवस्ती, हाऊसिंग सोसायट्यांत पाणी शिरण्याचे प्रमाण वाढले आहे. पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने अनेकदा या वस्त्यांना तळ्याचे स्वरूप प्राप्त होते. नगरपालिका प्रशासनाने नाल्यावरील अतिक्रमणाकडे लक्ष देऊन हे नाले अतिक्रमण मुक्त करण्याची गरज आहे.

# सामूहिक विवाह सोहळ्यातून सामाजिक एकोपा निर्माण होतो-गोपालदास अग्रवाल





**गोंदिया:** वेगवेगळ्या जातीधर्मात आपण विभागले असलो तरी आपण सर्व भारतीय व एक कुटुंब असल्याची भावना जपणे गरजेचे आहे. याच उद्देशाने सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन दरवर्षी करतो. सामूहिक विवाह सोहळ्यातून सामाजिक एकोपा निर्माण होण्यास मदत होते. समाजात सौहार्द आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे अशा प्रकाराच्या सोहळ्याचे आयोजन करणे गरजेचे असल्याने प्रतिपादन माजी आ. गोपालदास अग्रवाल यांनी केले.

प्रताप मेमोरियल ट्रस्टच्यावतीने तालुक्यातील कामठा येथील क्रीडा संकुलावर सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन शुक्रवारी (दि.१०) करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रामुख्याने आ.सहषराम कोरोटे, मध्य प्रदेशचे आ.मधू भगत, आ. अनुभा मुंजारे, माजी आ. हेमंत पटले, खोमेश्वर रहांगडाले, माजी जि.प. अध्य नेतराम कटरे, माजी काँग्रेस जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम कटरे, विनोद जैन व मान्यवर उपस्थित होते. यावेळी आयोजित सामूहिक विवाह सोहळ्यात सर्वधर्मीय ९१ जोडपी विवाहबद्ध झाली.

माजी आ. गोपालदास अग्रवाल म्हणाले सामूहिक विवाह सोहळ्यामुळे विवाह खर्चात मोठी बचत होते.यामुळे वधुपित्यावरील ताणसुद्धा कमी होतो. सामूहिक विवाह सोहळ्याच्या निमित्ताने सर्व समाजबांधव एकत्र येत असल्याने सामाजिक एकोपा वाढविल्यास मदत होते. त्यामुळे सामूहिक विवाह सोहळे ही काळाची गरज झाली. प्रताप मेमोरियल ट्रस्ट गेल्या अनेक वर्षापासून अक्षय्य तृतीयाला सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जाते.

यंदा सामूहिक विवाह सोहळ्यात विविध जातीधर्माची ९१ जोडपी विवाहबद्ध झाली. या जोडप्यांना शासनाच्या योजनांचा लाभसुद्धा प्रताप मेमोरियल ट्रस्टच्या माध्यमातून मिळवून दिला जातो. तसेच ट्रस्टतर्फे विवाहबद्ध झालेल्या जोडप्यांना गृहोपयोगी साहित्य दिले जात असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

# एनटी-३ वाघिणीने केला ६० किमीचा प्रवास

## वाघिणीच्या हालचालीवर बारीक लक्ष, पुन्हा दोन वाघिणी सोडण्याचे नियोजन



**गोंदिया:** नवेगावबांध-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात गेल्या महिन्यात एनटी-३ ही वाघीण सोडण्यात आली होती. या वाघिणीने कॉलर आयडी काढून टाकल्याने दोन दिवस ही वाघिण भरकटली होती. पण वन्यजीव विभागाच्या पथकाने या वाघिणीवर नियंत्रण मिळवून पुन्हा कॉलर आयडी लावून जंगलात सोडले होते. गेल्या पंधरा दिवसांपासून ही वाघीण या व्याघ्र प्रकल्पात स्थिरावली असून या वाघिणीने कोका अभयारण्यापर्यंत ६० किमीचा प्रवास केल्याची माहिती वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

नवेगावबांध-नागझिरा अभयारण्याचा ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या धर्तीवर विस्तार करण्यासाठी वन व वन्यजीव विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून गेल्यावर्षी २० मेरोजी राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत या अभयारण्यात दोन वाघिणी सोडण्यात आल्या होत्या. त्यानंतर गेल्या महिन्यात पुन्हा या व्याघ्र प्रकल्पात चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील एक वाघीण सोडण्यात आली होती. ही वाघीण या प्रकल्पात स्थिरावते की नाही, याची पाहणी करण्यासाठी या वाघिणीला कॉलर आयडी लावण्यात आली आहे. याच कॉलर आयडीच्या मदतीने वाघिणीच्या बारीक हालचालीवर नजर ठेवली जात आहे. दरम्यान, या वाघिणीने नवेगावबांध-नागझिरा अभयारण्याचाच भाग असलेल्या कोकापर्यंत ६० किमचा प्रवास केला आहे. कोका हा परिसर ६५३ चौरक किमीचा असून हा परिसर वन्यजीवांच्या दृष्टीने अनुकूल असल्याचे वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. नवेगावबांध-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सहा वाघ व दोन वाघीण सध्या वास्तव्यास आहेत. या वाघिणीला या व्याघ्र प्रकल्पात सोडल्यानंतर तेथील वाघांशी तिचा संघर्ष होण्याची भिती होती. परंतु असे काहीच घडले नसून ही वाघीण आता या प्रकल्पात स्थिरावत असल्याचे चित्र आहे.

वाइल्ड लाइफ इन्स्टिट्युट ऑफ इंडियाचे शास्त्रज्ञ बिलाल हबीब यांनी सांगितले की, एनटी-३ वाघीण ही एक शोध घेणारी आणि विखुरणारी मादी आहे. जोडीदार शोधण्यापेक्षा ती स्थायिक होण्यासाठी चांगल्या प्रदेशाचा शोध घेत आहे.

कोका परिसर तिला अनुकूल वाटल्यास ती या परिसरात स्थित होऊ शकते. असे सांगितले. वन्यजीव विभागाची संवर्धन स्थलांतरण योजना नवेगावबांध-नागझिरा व्जाघ्र प्रकल्पात वाघांची संख्या वाढविण्यास मदत करेल.

### ती वाघीण बालाघाट परिसरातील जंगलात

**गेल्या वर्षी २० मे रोजी नवेगावबांध-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात दोन वाघिणी सोडण्यात आल्या होत्या. यापैकी एक वाघीण भरकटत लगतच्या मध्य प्रदेशातील बालाघाट परिसरात जंगलात गेली होती. गेल्या वर्षभरापासून ती याच परिसरात असून, ती तिथेच स्थिरावण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

# शेतीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या- जि.प.सभापती संजय टेंभरे

## अवकाळी पावसाचा तडाखा; उन्हाळी धानशेतीचे नुकसान



**गोंदिया:** - जिल्ह्यात ७ मे रोजी तसेच आज ९ मे रोजी सकाळच्या दरम्यान आलेल्या अवकाळी पावसामुळे कापून ठेवलेले उन्हाळी धान पीक पाण्याखाली आलेले आहे. तसेच उभे असलेले धान भुईसपाट झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून झालेल्या नुकसानीचे शासनस्तरावर तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्या, अशी मागणी भाजप किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष तसेच जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी केली आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर उन्हाळी धानाची लागवड केली होती. बऱ्याच शेतकऱ्यांचे धानपिक परिपक्व झाले असून कापणी व मळणीला सुरुवात झाली आहे. उन्हाचा तडाखा व मजुरांची कम तरता यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी हार्वेस्टर मशीनच्या साहाय्याने मळणी केली.

परंतु एप्रिल महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचे धानपिक भुईसपाट झाले होते. त्यामुळे त्यांनी मजुरांच्या साहाय्याने धानपिकाची कापणी केली. परंतु अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे कापलेले धानपिक पाण्याखाली आलेले आहे. तर उभे असलेले धान वादळी वाऱ्याने भुईसपाट झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार असून उत्पादनात घट होणार, हे निश्चित.

शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला असल्याने बळीराजाचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे शासनस्तरावरून तत्काळ नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे करून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी भाजप किसान आघाडी जिल्हाध्यक्ष व जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी केली आहे.